मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या	डॉ. भाऊजी दफ्तरी
श्री नामदेवांची तीर्थावळी	रा. ना. घाटोळे
मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें	शंकर गोविंद चट्टे

याशिवाय कविता, अभिप्राय, पत्रव्यवहार व संघवार्ता.

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष १० संपादक मे १९५५
अंक २ दि. ब. पंडित किंमत आठ आणे

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

वर्ष १०   मे १९५५   अंक २ रा

संपादकीय

विदर्भ साहित्य संघाच्या ह्या वर्षाच्या कार्यकारिणीनें मला 'युगवाणी'चें संपादकत्व दिलें हा मी माझा गौरव समजतों. ह्या पदाला मी पात्र आहे की नाही ह्याची मला शंका आहे. संघाच्या कांही ज्येष्ठ कार्यकर्त्यांना देखील ही शंका आहे. ह्याला द्विविध कारणें आहेत. एकतर मला लेखनाचा आणि संपादन कार्याचा अनुभव फार अल्प आहे. माझ्या पूर्वी होऊन गेलेल्या संपादकांची परंपरा पाहिली की मला माझें लघुत्व फारच जाणवतें. दुसरें कारण असें की 'युगवाणी' हें एका मोठ्या साहित्यसंस्थेचें मुखपत्र आहे. त्या संस्थेच्या प्रतिष्ठेला साजेल असें त्याचें संपादन झालें पाहिजे. साहित्यिक आणि साहित्य ह्याचें महत्त्वमापन कसें करायचें ह्याचें ज्याच्यापाशीं किंचित्‌हि गमक नाही अशा माझ्यासारख्यानें ह्या भानगडींत पडावेंच कशाला, असा रास्त प्रश्न येथे उद्भवतो.

ह्यालाहि दोन उत्तरें आहेत. एकतर हे दिवस लोकशाहीचे आहेत आणि म्हणून लोक म्हणतील तो नेता, लोक म्हणतील तो थोर आणि लोक ठरवितील तो पात्र. लोकशाहीचीं मूलभूत तत्त्वें हीं तर विदर्भ साहित्य संघाचा आधार आहेत. येथे लोकशाहीचा पूर्ण प्रकर्ष झालेला आहे. लोकांच्या इच्छेने येथे सारें कांही घडणार. त्याला उपाय नाही.

लोकांची इच्छा माझ्यावर ही जबाबदारी लादूं शकत नाही. ती जबाबदारी देऊं शकते ही गोष्ट खरी. ती घ्यावी की नाही हा प्रश्न मला सोडवितां आला असता आणि जबाबदारी मला टाळतां आली असती. पण मी तसें केलें नाही. तसें करायला अंगीं विनय हवा. म्हणून जबाबदारी मीं बाजूला सारली नाही. सरळ सांगायचें म्हणजे हें पद मीं बाजूला सारलें नाही. माझा माझ्यावर नाही तरी माझ्या सहकाऱ्यांवर पूर्ण विश्वास आहे.

डॉ. ना. के. महाजन, श्री तु. ना. काटकर, श्री मा. नी. गलगलीकर, श्री रा. ना. घाटोळे आणि श्री म. अं. चान्सरकर ह्यांनी मला सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें आहे. त्यांच्याच सहकार्यानें मी हें काम पार पाडूं शकेन असें मला वाटतें. शिवाय डॉ. के. ल. दप्तरी ह्यांनी मला आपलें साहित्य पुरविण्याचें मान्य केलें आहे. हा त्यांचा मोठाच अनुग्रह होय. त्यांचें साहित्य प्रसिद्ध करण्याची संधि या संपादक-मंडळाला लाभावी हें भाग्याचें लक्षण होय. त्यांच्या लेखांमुळे का होईना 'युगवाणी'चा अंक मौलिक ठरेल अशी खात्री आहे. 'युगवाणी'चें स्वरूप कसें असावें ह्याच्या विपुल सूचना मजकडे आल्या आहेत. सूचना सुहृद्भावाच्या द्योतक आहेत. त्यांचा अव्हेर कसा करतां येईल? अडचण आमच्या शक्तीच्या मर्यादेची आणि हातीं येणाऱ्या साहित्याच्या रूपाची. साहित्य जर विविध प्रकारांचें, रंगरूपाचें आणि रुचिसंपन्न असेल तर तें कोण बाजूला सारील? लेखक, कवि आदींनी मनावर घेतलें तर ते आमच्याहि हातून सर्वप्रिय संपादन करून घेऊं शकतील. त्यांच्या साहाय्यासाठी आमची प्रार्थना आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपनिषदर्थव्याख्या

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दप्तरी

ईशोपनिषद्

ईशोपनिषद हें शुक्लयजुर्वेदाचा शेवटचा भाग आहे. याज्ञवल्क्याने कृष्ण यजुर्वेद म्हणजे तैत्तिरीयसंहिता ओकून नंतर त्याने शुक्लयजुर्वेद म्हणजेच वाजसनीय संहिता सूर्यापासून मिळविली व हा याज्ञवल्क्य वैशंपायनाचा शिष्य होता, वगैरे हकीकत वायुपुराण अध्याय ६१ मध्ये दिली आहे. वायुपुराण अध्याय ९९ मध्ये, पांडवांचा पणतू जनमेजय ह्याने वैशंपायनाच्या विरोधास न जुमानतां वाजसनेय ब्राह्मण स्थापन केले व वाजसनेयक ब्रह्म (वेद) प्रवृत्त केले असें सांगितलें आहे. ह्यावरून शुक्लयजुर्वेद अर्थात् ईशोपनिषद् जनमेजय पांडवाच्या राज्यांत याज्ञवल्क्याने केलें असें ठरतें. पांडवांचें भारतीय युद्ध इ. सनापूर्वी ११९७ ह्या काळीं झालें. व पांडवांचें निधन इ. सनापूर्वी ११७५ ह्या काळीं झालें हें मीं दुसऱ्या ग्रंथांत सिद्ध केलेंच आहे. भारतीय युद्धाच्या वर्षीच जनमेजयाचा बाप परिक्षिती जन्मला. ह्यावरून जनमेजयाचा जन्म इ. सनापूर्वी सुमारें ११७० व त्याच्या राज्याचा आरंभ इ. सनापूर्वी सुमारें ११५० ठरतो. म्हणून ईशोपनिषद् इ. सनापूर्वी सुमारें ११५० ह्या काळीं याज्ञवल्क्याने केलें असें ठरतें.

घटनेची योजनाः—कर्म व ज्ञान ह्या दोहोंच्या संयोगानेच अमृताची म्हणजे आत्यंतिक सुखाची प्राप्ति होते हें सांगून कर्म कसें करावें व तें ज्ञान कोणतें हें सांगणें हीच ह्या उपनिषदाची घटनेची योजना आहे. ह्या उपनिषदास जें सांगावयाचें आहे तें त्यांत एकाच अध्यायांत अठरा श्लोकांत सांगितलें आहे.

श्लोक १ : ईशा वास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथाः मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥१॥

अर्थः—ह्या जगांत जें कांही क्षणभंगुर आहे, तें सर्व ईश्वराने रहावयाचें म्हणजे ईश्वराच्या मालकीचें घन आहे. त्याचा म्हणजेच क्षणभंगुर अशा विषयसुखाचा किंवा परावलंबी सुखाचा त्याग करून तुवां आनंदाचा उपभोग घ्यावा. दुसऱ्याच्या (म्हणजे येथे ईश्वराच्या वर निर्दिष्ट केलेल्या) धनाची इच्छा करूं नकोस (कारण तसें करणाऱ्यास दंड होतो).

टिप्पणीः—"ईश्" म्हणजे ईश्वर ह्याची येथे तृतीया केली आहे.

"वास्यं" हें वस् म्हणजे राहणें यापासून झालेलें आहे. ह्याचा अर्थ "राहावयाचें" असा आहे. ईश्वराने राहावयाचें म्हणजे ईश्वराच्या मालकीचें असा अर्थ आहे.

"जगत्" म्हणजे ज्याला गति आहे तें म्हणजे जें चंचल–क्षणभंगुर आहे तें.

"तेन त्यक्तेन" म्हणजे त्याचा त्याग करून.

"भुंजीथाः"—हें आत्मनेपदाचें विधिलिङाचें रूप असल्यामुळे ह्याचा अर्थ "उपभोग घे" "आनंद प्राप्त करून घे" असाच केला पाहिजे. श्री शंकराचार्यांनी पालन कर असा अर्थ केला आहे तो चूक आहे; कारण भुज् आत्मनेपद = उपभोग घेणें; भुज् परस्मैपद = अवमन करणें.

"कस्यस्वित्" म्हणजे "कोणाचेंही" म्हणजे "दुसऱ्याचें" असा भावार्थ आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्लोक २ कुर्वन्नेवेहकर्माणि जिजीविषेच्छतं समाः।
एवं त्वयिनान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥२॥

अर्थः—(विषयसुखाचा त्यागच करावयाचा तर मग कर्मेंच करण्याची गरज नाही असेंही तूं समजूं नकोस.) कर्तव्यकर्मे करीतच ह्या लोकीं शंभर वर्षे जिवंत राहण्याची इच्छा करावी. ह्याप्रमाणें वागल्याने म्हणजे मरेपर्यंत कर्तव्यकर्म केल्याने (एवम्' मनुष्य असा जो तूं त्या तुला (त्वयि नरे) कर्मांचा वासनारूपी लेप लागणार नाही. (कर्मांचा लेप होऊं नये ह्याकरितां) ह्याहून दुसरा मार्ग नाही. (इतः अन्यथा न अस्ति)

श्लोकाच्या द्वितीयार्धाचा अन्वयः—

एवम् त्वयि नरे कर्म न लिप्यते, इतः अन्यथा न अस्ति।

टिप्पणेः—विषयसुखाचा त्यागच करावयाचा तर मग कर्मेंच करण्याची गरज नाही असें कोणाला वाटेल म्हणून कर्में मरेपर्यंत केलींच पाहिजेत असें सांगण्याकरिता हा श्लोक योजिला आहे. ह्यांतील "जिजीविषेत्" ह्या पदाचें स्वारस्य फार खोल आहे. हे सन्नंत असल्यामुळे, ह्या श्लोकाच्या पहिल्या अर्धाचा अर्थ "शंभरही वर्षे म्हणजे आयुष्य आहे तोंपर्यंत कर्में करीतच जिवंत राहण्याची इच्छा करावी" असा आहे, "म्हणजे कर्में कधीच टाकूं नयेत." असा अर्थ आहे; व तो श्री शंकराचार्यांच्या मताच्या विरुद्ध आहे. म्हणून, त्यांनी, हा श्लोक अज्ञान्याकरिता सांगितला आहे व पहिला श्लोक ज्ञान्याकरिता सांगितला आहे. असें ग्रहण केलें आहे तें चूक आहे; कारण असें ग्रहण करण्यास कारण कांहीच नाही. "विशेषादर्शनं यावत्तावत्सामान्यदर्शनम्" म्हणजे जोंपर्यंत एखादें वचन एखाद्या विशिष्ट परिस्थितीसच लागूं आहे असें दिसून येत नाही, तोंपर्यंत तें सर्वच परिस्थितीस लागूं असतें, ह्या तत्त्वाचा श्री शंकराचार्यांनी त्याग केला आहे. येथे हा श्लोक अज्ञान्यांसच लागूं आहे किंवा ज्ञान्यांसच लागूं आहे असें सांगणारा विशेषवाचक शब्द कोणताच नाही. म्हणून हा श्लोक ज्ञानी व अज्ञानी ह्या दोघांसही सारखाच लागूं आहे. ह्याला "जिजीविषेत्" हें सन्नंत म्हणजे इच्छावाचक आहे ह्याचें अतिशय पोषक पुरावा आहे. श्री शंकराचार्यांच्या मताप्रमाणें अज्ञान्यानेहि ज्ञानी होऊन कर्में टाकण्याचीच इच्छा करावी असें ठरतें. अर्थात् कर्म करण्याचीच तूं जन्मभर इच्छा कर हें त्याला सांगणें श्री शंकराचार्यांच्याही मताच्या विरुद्ध आहे. म्हणून हें सन्नंत श्री शंकराचार्यांच्या सिद्धांताशीं जुळत नाही. म्हणून ते "यज्जिजीविषेत् शतं वर्षाणि तत्कुर्वन्नेव जिजीविषेत्" असा अर्थ करतात; पण त्याकरितां "यज्जिजीविषेत्त्" हे पदरचे शब्द त्यांना घालावे लागतात. असें करणें अर्थातच चूक आहे. इतर उपनिषदांच्या अर्थास अनुसरून ह्या उपनिषदांतील वचनांचा अर्थ मर्यादित करणें चूक आहे हें उघडच आहे.

कर्तव्यकर्म करीत असतां मरण येत असेल तर तें कर्म टाळावें असा ह्या श्लोकाचा अर्थ घेऊं नये. कारण तें कर्तव्यकर्म न करतां जिवंत राहणें होईल, आणि श्लोकांत तर कर्तव्यकर्म करीतच जिवंत राहणें हें अभिप्रेत आहे. कर्तव्यकर्में करण्याकरितां जिवंत राहण्याची इच्छा करावी, अर्थात् कर्तव्यकर्में केव्हाच टाकूं नयेत असा ह्या श्लोकाचा भाव आहे.

जैमिनीच्या मतें, ह्या श्लोकांत अभिप्रेत असलेलीं कर्में म्हणजे वेदोक्त अग्नींधनादि कर्में म्हणजेच अग्निहोत्र व यज्ञ, हीं होत. ह्या मताचें व्यासांनीं ३।४ येथे खंडन करून हीं कर्में वैकल्पिक ठरविलीं आणि शमदमादि कर्में, प्राणधारणार्थक कर्में आणि आश्रमकर्में हीं आवश्यक ठरविलीं. व्यासाचेंच मत ग्राह्य आहे. (व्याससूत्रें ३।४ वरील माझें विवरण पहा). एकंदरीत आवश्यक कर्तव्यकर्में असा येथील कर्म शब्दांचा अर्थ आहे.

ज्ञानी मनुष्य कर्मेंच करूं शकत नाही हा आक्षेपहि टिकूं शकत नाही. कारण ह्या उपनिषदाचा कर्ता जो याज्ञवल्क्य त्याने ज्ञानी झाल्यावरच जनकास उपदेश करण्याचें कर्म केलें. व्याससूत्र ४-१-१५ च्या भाष्यांत श्रीशंकराचार्यांनीहि, ज्ञानी देखील देहपातापर्यंत कर्में करतो असें मान्य केलें आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्लोक ३ : असुर्या नाम ते लोकाः अंधेन तमसा वृताः।
तांस्तेऽप्रेत्याभिगच्छंति येके चात्महनोजनाः ॥३॥

अर्थ—आत्मज्ञानामुळे होणारा जो आनंद त्याचा त्याग करणारे (आत्महनः) अर्थात् पहिल्या श्लोकांत टाकावयास सांगितलेल्या विषयसुखांच्या मागे लागलेले असे जे कोणी मनुष्य असतात त्यांना असुरांस प्राप्त होणारी (असुर्याः) गाढ अंधकाराने म्हणजेच अत्यंत दुःखाने व्यापलेली अवस्था (लोकाः) मरणापूर्वींच (अप्रेत्य) प्राप्त होते.

टिप्पणें:—"अप्रेत्य" असा पदच्छेद करावा, कारण त्याने उपपन्न असा फार सुंदर अर्थ होतो. बृहदारण्यकोपनिषदांतही हाच श्लोक थोडया फरकाने आलेला आहे. तेथील श्लोक असा—

अनंदा नाम ते लोका अंधेन तमसा वृताः।
तांस्ते प्रेत्याभिगच्छंति अविद्वांसोऽबुधो जनाः॥
४–४–११

ईशोपनिषद् याज्ञवल्क्याने केलें व बृहदारण्यकोपनिषद् त्याच्या शिष्याने केलें हें त्या उपनिषदाच्या प्रकरणांत दाखविलें आहे. अर्थात् बृहदारण्यकोपनिषदांतील ह्या श्लोकांत त्या शिष्याने ईशोपनिषदांतील ह्या श्लोकाचाच अर्थ स्पष्ट करण्याकरिता ह्या श्लोकांत बदल केला असला पाहिजे. त्या बदलावरून ईशोपनिषदांतील श्लोकाचा अर्थ काय आहे तें समजून येतें. तें असें. आत्महन् म्हणजे अविद्वान् व अबुध म्हणजे आत्म्याला न जाणणारा व त्यामुळे मूर्खपणा करणारा म्हणजे विषयसुखाच्या मागे लागणारा. अनंदाः म्हणजे आनंदरहित असा अर्थ आहे. ही अवस्था मरणापूर्वींहि असतेच म्हणून "अप्रेत्य" असा जो पदच्छेद मी करतो त्याला आधार मिळतो.

श्लोक ४–८:—

अनेजदेकं मनसो जवीयः।
नैनद्देवाः आप्नुवन्पूर्वमर्षत्।
तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्।
तस्मिन्नपोमातरिश्वा दधाति ॥४॥

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके।
तदंतरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥५॥

यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥६॥

यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद्विजानतः।
तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥७॥

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणम्।
अस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ॥
कविर्मनीषी परिभूः स्वयंभू।
याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥८॥

अर्थः—हें आत्मतत्त्व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणारें असें नाही (अनेजत्). तें एकच (सर्व ठिकाणीं) आहे. अर्थात् तें मनापेक्षाहि वेगवान् आहे (असें म्हणतां येतें.) पुढे पुढे धावणाऱ्या ह्या आत्मतत्त्वाला इंद्रियें [देवाः] पकडूं शकलीं नाहीत म्हणजे जाणूं शकलीं नाहीत. एकाच शरीरांत राहणारें [तिष्ठत्] हें आत्मतत्त्व धावणाऱ्या दुसऱ्या कोणापेक्षाहि (मनाच्या रूपाने) अधिक पुढे जातें. त्याच्या करितांच [तस्मिन्] म्हणजे त्याला आनंदित करण्याकरितांच प्राण [मातरिश्वा] कर्में [अपः] करतो [दधाति] ॥४॥ तें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं (मनाच्या रूपानें) हालतें. परंतु वास्तविक तें हालत नाही. तें (जाणण्यास कठीण असल्यामुळे जणूं) दूर आहे. परंतु वास्तविक तें जवळच आहे कारण तें ह्या सर्वांच्या अंतरांतच आहे. [अंतर्] ह्या सर्वांच्या बाहेरही तें आहेच ॥५॥ जो सर्वभूतें म्हणजे जीव आत्म्यांतच म्हणजे स्वतांमध्ये आहेत आणि सर्व जीवांमध्ये आत्मा म्हणजे मी स्वतांच आहों असें पाहतो तो कोणाहि पासून स्वतःचें रक्षण करण्याची इच्छा करीत नाही म्हणजे कोणालाच भीत नाही किंवा कोणाचा द्वेष करीत नाही. ॥६॥ ज्या विद्वानाच्या दृष्टीने सर्व भूतें आत्माच बनले त्या एकत्व पाहणाऱ्या विद्वानाला कोणता शोक किंवा मोह होईल? (होणार नाही हा भाव) ॥७॥ तोच आत्मा भोवतालीं म्हणजे चोहीकडे पसरला [पर्यगात्] (त्यामुळेच जग बनलें) तो आनंदरूपी तेजाने युक्त आहे [शुक्र]; तो शरीररहित आहे किंवा तो शरीर नव्हे, त्याला कधीच व्रण (जखम) होत नाही. त्याला स्नायु नाही. त्याला पाप कधीच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागत नाही म्हणून तो शुद्ध आहे. तो ज्ञानवान् आहे [कविः] तो बुद्धिमान् आहे [मनीषी]; तो स्वयंभू आहे म्हणजे स्वतांच आहे (म्हणजे त्याला दुसऱ्या कोणी उत्पन्न केलें नाही) तो सर्वांचा पराभव करणारा [परिभू] म्हणजे सर्वांना आपल्या कह्यांत ठेवणारा आहे. त्यानेच अनंत काळापूर्वी (शाश्वतीभ्यः समाभ्यः) सर्व वस्तू जशा पाहिजेत तशा (याथातथ्यतः) करून ठेवल्या. ॥८॥

टिप्पणें—ज्या आत्मज्ञानाच्या अभावामुळे श्लोक ३ मध्ये वर्णिलेली दुर्गति प्राप्त होते तें आत्मज्ञान ह्या पांच श्लोकांत सांगितलें आहे. ह्यांत मुख्यतः आत्मा स्वताच आनंद आहे. [शुक्रम्] आणि सर्वभूतीं एकच आहे ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. आत्मा आणि जगन्निर्माता म्हणजे ईश्वर एकच होत असेंहि श्लोक ८ मध्ये सांगितलें आहे.

"अपः" = निघंटुमध्ये अध्याय २ च्या आरंभींच कर्मवाचक शब्द दिले आहेत. त्यांमध्ये 'अपः' हा पहिलाच आहे. श्री शंकराचार्यांनीहि 'अपः' ह्याचा कर्मे असाच अर्थ केला आहे.

उवटाचार्यांच्या भाष्यांत 'विजुगुप्सते' ह्याऐवजी 'विचिकित्सति' असा पाठ आहे. त्याचा अर्थ 'आपण व दुसरा ह्यांमध्ये भेद आहे असें मानण्याची चूक तो करीत नाही' असा होईल. (विचिकित्सति = चूक करतो) किंवा भेद आहे असा संशय घेत नाही असाही उवटाचार्यानुसार अर्थ घ्यावा.

श्लोक ९–११

अंधं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमः य उ विद्यायां रताः ॥९॥
अन्यदेवाहुर्विद्यया अन्यदाहुरविद्यया ॥
इति शुश्रुम धीराणां येनस्तद्विचचक्षिरे १०॥
विद्यांचाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ॥
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥११॥

अर्थः—जे केवळ कर्मांची [अविद्यां] उपासना करतात ते गाढ अंधकारांत जातात. परंतु जे केवळ ज्ञानाची [विद्यायां] उपासना करतात, ते जणू त्या पेक्षाहि अधिक गाढ अशा अंधकारांत जातात. (हा अर्थ असमंजस आहे. असेंच आजपर्यंतचे बहुतेक टीकाकार मानत आले. परंतु केवळ कर्मांची उपासना करणारे पाश्चिमात्य लोक परस्परांशीं आज अत्यंत निकराने भांडत आहेत, व केवळ आत्मज्ञानाची उपासना करणारे भारतीय त्याच पाश्चिमात्यांचे गुलाम झाले होते हें पाहून तरी हा भ्रम नाहीसा होऊन ह्या श्लोकांतील सिद्धांत पटेल अशी मी आशा करतों. केवळ आत्मज्ञानांतच गढलेल्याची शरीरयात्रा देखील न चालल्यामुळे तो अधिक घोर अंधारांत पडेल. शरीरयात्रेकरितां त्याला दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागेल व दुसऱ्याकडून मदत न मिळाली तर भूकतहानेने, शरीराने व मनाने तळमळत मरावें लागेल. केवळ कर्म करणारा निदान शरीराने तरी सुस्थितींत व सुखांत राहील, एकूण केवळ ज्ञानोपासकाचीच दुर्गति अधिक वाईट) ॥९॥ विद्येचें फळ दुसरें आहे आणि अविद्येचें फळ दुसरें आहे असें म्हणतात. हें आम्ही, ज्या शहाण्या लोकांनी आम्हांस सांगितलें त्यांपासून ऐकलें आहे. दोहोंचीं दोन भिन्न फळ आहेत व तीं दोनहि फळें मनुष्यास पाहिजेत. म्हणून कर्म आणि विद्या ह्यांचा समुच्चय केला पाहिजे असा भावार्थ आहे. ॥१०॥ (तीं भिन्न फळें अशीं) विद्या व अविद्या म्हणजे कर्म हीं दोनहि जो एकदम [सह] जाणतो म्हणजेच ह्या दोहोंची जो एकदम उपासना करतो, तो कर्मांनी मृत्यूला टाळून (हीच गोष्ट स्पष्टपणें बृहदारण्यकोपनिषदांत यादिदमाहुः...प्रयच्छति १।५।२ येथे सांगितली आहे) जीवंत राहतो, आणि ह्या रीतीने जिवंत असतांना विद्येने तो अमृताचा म्हणजे अत्यानंदाचा उपभोग मिळवितो. ॥११॥

टिप्पणें:—वर आत्मज्ञानाचें महत्त्व सांगून आत्मज्ञानहि सांगितलें. कर्महि करावें असें श्लोक १–२ मध्ये सांगितलें. आता कर्म व ज्ञान ह्यांचें फळ कोणतें तें ह्या श्लोकांत सांगतात व त्यावरून दोहोंचीहि आवश्यकता प्रतिपादतात. ह्या श्लोकांतील "अविद्या" ह्या शब्दाचा अर्थ सर्व टीकाकारांनी "कर्म" असाच केला आहे; आणि संदर्भावरून तो तसाच ठरतो. ह्या श्लोकांमध्ये "विद्या" व "अविद्या" ह्यांचें फळ सांगितलें आहे. त्यापैकीं "विद्या" म्हणजे येथेच सांगितलेलें आत्मज्ञान हा अर्थ उघड उघड निश्चित आहे. उवटाचार्यांनीहि हाच अर्थ घेतला आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थात् "अविद्या" म्हणजे येथेच सांगितलेली दुसरी गोष्ट जें कर्म तेंच असलें पाहिजे. "विद्या" म्हणजे "ज्ञान" असा सामान्य अर्थ आहे तरी तें "देवताज्ञान" होय असें श्री शंकराचार्य म्हणतात. तें चूक आहे. कारण ज्ञान ह्या मोघम शब्दावरून येथेच सांगितलेलें आत्मज्ञानच घेतलें पाहिजे हें उघड आहे. श्री शंकराचार्यांनी हा जो विशिष्ट अर्थ घेतला तो संन्यास प्रतिपादक उपनिषदांशीं समन्वय करण्याकरिता घेतला हें उघड आहे. "अविद्यया मृत्युं तीर्त्वा" ह्याचा अर्थ सनातनी लोक वेदोक्तकर्मांनी मनुष्य अजीबात मरणरहित होतो असा करतील. पण तो चूक आहे. कारण असें मरणराहित्य वेदांमध्ये कोठेच सांगितलें नाही. उलट प्रजांच्या रूपानेच मनुष्य मरणरहित होतो असेंच सांगितलें आहे, असें आपस्तंब म्हणतो. त्याचें वाक्य असें आहे.

"अथाप्यस्य प्रजातिममृतमाम्नाय आह—
प्रजामनुप्रजायसे तदु ते मर्त्यामृतमिति"
(प्रश्न २ पटल ९ कंडिका २४ सूत्र १)

अर्थः—"हे मर्त्या, आपल्या संततीमध्ये तूं उत्पन्न होतोस हेंच तुझें अमृत म्हणजे मरणराहित्य होय." ह्या वचनाने वेदाने [आम्नायः] सांगितलें आहे की "संततिरूपाने जन्मणें हेंच मनुष्याचें मरणराहित्य होय." म्हणूनच वेदाने "प्रजाभिरग्ने अमृतत्व मश्याम" (अर्थः—संतति प्राप्त झाल्याने आम्ही मरणराहित्य भोगावें) एवढेंच मागण्यास शिकविलें आहे. बृहदारण्यकोपनिषदांत १-५-२ येथेहि एक वर्षपर्यंत दुधाच्या आहुति दिल्याने मनुष्य पुनःपुनः येणाऱ्या मृत्यूस जिंकतो असें कोणी म्हणतात तें खरें मानूं नये. कारण, ज्या दिवशीं हवन करतो म्हणजे इंद्रियांत अन्नाचें हवन करतो त्याच दिवशींचा मृत्यु [पुनर्मृत्यु = पुनः पुनः म्हणजे दररोज येणारा मृत्यु] हा अन्नादिकांच्या अभावाने येतो. जिंकतो असें स्पष्ट म्हटलें आहे. ब्रह्मवेत्ताहि मरतो असें तर अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. विशेषतः बृहदारण्यकोपनिषत् ४।४।६-७ पहा. भगवद्गीता अध्याय २ येथील शेवटचा श्लोक "स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति" पहा. मुंडकोपनिषदांतील "ते ब्रह्मलोकेषु परांतकाले" (३।२।६-७) इत्यादि ह्यांतील "परांतकाले" हा शब्द हेंच सांगतो की ब्रह्मवेत्ताहि मरतो.

"अमृतम्" = "अमृत" म्हणजे आनंद असा अर्थ होतो असें उपनिषदांचा उपसंहार प्यारा २८ येथे दाखविलें आहे.

श्लोक १२–१४—

अंधं तमः प्रविशंति येऽसंभूतिमुपासते ।।
ततोभूय इव ते तमो य उ संभूत्यां रताः ।।१२।।
अन्येदेवाहुः संभवादन्यदेवाहुरसंभवात् ।।
इति शुश्रुम धीराणां येनस्तद्विचचक्षिरे ।।१३।।
संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयं सह ।।
विनाशेन मृत्युं तीर्त्वा संभूत्यामृतमश्नुते ।।१४।।

अर्थः—जे केवळ विनाशी वस्तूंची (असंभूति) उपासना करतात ते गाढ अंधकारांत जातात. परंतु जे केवळ अविनाशी [संभूति] वस्तूची म्हणजे अविनाशी आत्म्याची उपासना करतात ते त्यापेक्षाहि गाढ अशा अंधकारांत जातात. ।।१२।। अविनाशी वस्तूचें फळ दुसरें आहे आणि विनाशी वस्तूंचें फळ दुसरें आहे असें म्हणतात. हें आम्ही, ज्या शहाण्या लोकांनी आम्हांस सांगितलें त्यापासून ऐकलें आहे. दोहोंचीं दोन भिन्न फळें आहेत व तीं दोनहि फळें मनुष्यास पाहिजेत म्हणून विनाशी व अविनाशी ह्या दोहोंच्या उपासनांचा समुच्चय केला पाहिजे असा भावार्थ आहे. ।।१३।। (तीं भिन्न फळें अशीं) अविनाशी वस्तू व विनाशी वस्तू ह्या दोहोंनाहि जो एकदम [सह] जाणतो म्हणजे दोघांची उपासना एकदम करतो, तो विनाशी वस्तू उदाहरणार्थ, अन्न, पाणी, वस्त्र, घर, औषधें वगैरे ह्यांनी मृत्यूला तरून जातो म्हणजे जिवंत राहतो आणि ह्या रीतीने जिवंत असतांना अविनाशी वस्तू जो आत्मा त्याने म्हणजे त्याविषयींच्या यथार्थ ज्ञानाने अमृताचा म्हणजेच अत्यानंदाचा, उपभोग मिळवितो. ।।१४।।

टिप्पणें:—श्लोक ९-११ वर जीं टिपणें आहेत तींच येथेहि वाचवींत. श्लोक ९ ते ११ च्या अर्थाप्रमाणेच ह्या श्लोकांचाहि अर्थ उपपन्न आहे हें उघड आहे. कर्मांनी विनाशी वस्तू प्राप्त होतात. आणि विद्येने अविनाशी वस्तू जो आत्मा त्याचें ज्ञान होतें हा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संबंध लक्षांत ठेवला असतां श्लोक ९-११ नंतर श्लोक १२ । १४ सांगण्याचें कारण समजेल.

श्लोक : १५-१८

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ॥
तत्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥१५॥
पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूहरश्मीन्समूह ॥
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि ॥
योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥१६॥
वायुरनिलममृतं अथेदम् भस्मांतं शरीरम् ॥
ॐ क्रतो स्मर कृतं स्मर क्रतो स्मर कृतं स्मर ॥१७॥
अग्ने नय सुपथा राये अस्मान् ।
विश्वानि देव वयुनानि विद्वान् ॥
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो ।
भूयिष्ठांते नम उक्तिं विधेम ॥१८॥

अर्थ:—सोन्याच्या झाकणाने म्हणजे चकाकून मोह पाडणाऱ्या विषयानंदाने सत्याचें म्हणजे आत्मानंदाचें तोंड झाकलें आहे म्हणजे आत्मानंदाचा मार्ग बंद केला आहे. हे पूषन् (आत्म्या) तें झाकण, सत्य हाच धर्म मानणारा जो मी त्याकरिता, दृष्टये म्हणजे ज्ञानाकरिता (म्हणजे त्या मला ज्ञान होण्याकरिता) तूं काढून टाक ॥१५॥ हे पूषन् (आत्म्या) (आत्म्याला पूषन् म्हणण्याचें कारण ताच प्राणाला पोषण म्हणजे शक्ति देतो), हे एकच असलेल्या ऋषे (ऋषि म्हणजे ज्ञानी), सर्वांचें संयमन करणाऱ्या यमा, आपल्या किरणांनी अज्ञानांधःकार घालविणाऱ्या सूर्या, प्रजापतीने म्हणजे आनंद नांवाच्या ब्रह्मदेवाने ज्याची पुरातन काळीं उपासना केली अशा आत्म्या, आपलीं ज्ञानरूपी किरणें चोहीकडे पसरीव, [व्यूह]. आपलें तेज चांगल्या रीतीने पसरीव, [समूह]. अशाकरितां की तुझें जें तेज म्हणजेच अत्यंत कल्याणकारक आनंदात्मक रूप तें मी पाहीन ॥ आणि तो तो (असौ असौ) जो (यो) पुरुष (शरीररूपी पुरांत राहणारा जीव) आहे तो तो मीच आहे म्हणजे सर्व जीव मीच आहे असेंहि पाहीन ॥१६॥ मृत्युकाळीं वायु म्हणजे शरीरांतील प्राण न मरणाऱ्या [अमृत] अनिलांत म्हणजे सर्व जगांत वावरणाऱ्या वायुसंज्ञक शक्तींत जाऊन मिळतो. ('अयति' असा शब्द अध्याहृत घ्यावा लागतो. शंकराचार्यहि येथे असा अध्याहार मानतात) आणि शरीराचा भस्मांतच अंत होतो म्हणजे मेल्यानंतर जीव पुनः जन्मत नाही असा भाव आहे. (बृहदारण्यकोपनिषद् ३।९।२८ पहा, तदनुसारच हा अर्थ करणें भाग आहे व केला आहे.) अर्थात् आनंदाच्या अनुभवाकरितां जिवंत राहणें हें कर्तव्य ठरतें व त्याकरितां सत्कर्म केलें पाहिजे म्हणून हे [ॐ] क्रतो ! (हे बुद्धे किंवा हे जीवा) चांगलें कर्म करण्याची [कृतं] आठवण ठेव. हे बुद्धे किंवा हे जीवा, चांगलें कर्म करण्याची आठवण ठेव. ॥१७॥ हे अग्ने ! सर्व विद्या, कला व शास्त्रें [वयुनानि] जाणणाऱ्या [विद्वान्] अग्ने ! आम्हास चांगल्या मार्गाने धनाकडे [राये] घेऊन जा आणि आमचे प्राण हरण करणाऱ्या कुटिल [जुहुराणं] पापास (म्हणजे दारिद्र्यास, अन्नाद्यभावास), आमच्यांतून [अस्मत्] युद्ध करून काढून टाक. आम्ही तुला वारंवार पुष्कळ नमस्कार करतों.

टिप्पणें—ज्ञान व कर्म दोनहि आवश्यक आहेत म्हणून आता श्लोक १५ ते १६ मध्ये ज्ञानाकरितां पूषाची म्हणजे आत्म्याची प्रार्थना केली आहे, व श्लोक १७ मध्ये कर्माची आवश्यकता दाखवून श्लोक १८ मध्ये कर्मांना धनाची आवश्यकता आहे म्हणून धनाकरितां अग्नीची म्हणजेच धन प्राप्त करून देणाऱ्या कर्मासाठी आवश्यक असलेल्या सर्व विद्या व कला जाणणाऱ्या कर्मदेवतेची प्रार्थना केली आहे. "क्रतु"—निघंटु ३।९ येथे प्रज्ञावाचक शब्दांमध्ये क्रतु' आहे. म्हणून ह्याचा अर्थ बुद्धि किंवा बुद्धि ज्याला आहे तो जीव असाहि होईल. ऐतरेयोपनिषदांत अध्याय ६ मध्ये जीववाचक शब्दांमध्ये "क्रतु" हाहि एक शब्द आहे.

कर्म हेंच धन प्राप्त करून देऊं शकतें म्हणून "अग्नि" म्हणजे कर्म हें उघड आहे. अर्थात् येथील "अग्नि" ही कर्मदेवता मानली पाहिजे. 'युयोधि'—'युध्'चें पौनःपुन्यदर्शक लोट् मध्यम पुरुषाचे रूप "योयुद्धि" व्हावें. त्याचा हा आर्षप्रयोग समजावा किंवा पाठभ्रंश समजावा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

तें नव्हतें खोटें सारें !

मज व्याकुळ वदतें वारें–
तें नव्हतें खोटें सारें,
खोटयांतहि होतें कांही
जें मजला कळलें नाही !

त्या इवल्या नाजुक नेत्रीं
शुक्राची शिंपुन कांती
तूं होतिस हासत मुक्त
मोही तुज केली साथ
ते अवखळ सायंमेघ
क्षितिजाची लंघुन रेघ
प्राचीला स्पर्शुन जात
परि शब्द न अपुले सरत
थरथरत पाहुनी अपुल्या
छायेंत मिसळल्या छाया
ती लांब वाट वळणांची
संपण्यास नव्हती राजी...

हें असलें होतें तरिही
सत्य त्यांत लवही नाही
तें आहे खोटें खोटें
हृदयास असें नित वाटे
पाण्यांत जुळावीं काष्ठें
विधि तसा आपणां लोटे
ही क्षणयक्षाची किमया
क्षणभरांत जाइल विलया
येऊन मनीं हें अपुल्या
ज्योति होत थिजल्या विझल्या !
जें सहजच होतें घडत
हर्ष खेद नव्हता त्यांत !...

परि आज अचानक आता
तव स्मृती तरंगत येतां
अंधारामधुनी काळें
कुणि उरीं उसासत विव्हळें
वदतें अन् व्याकुळ वारें—
तें नव्हतें खोटें सारें
खोटयांतहि होतें कांही
जें मजला कळलें नाही !...

—वसंत निनावे

फोड नव्हे मी

[कविवर्य शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या " जेव्हा आत्मा फोडासम दुखवतो " या कवितेची दुसरी बाजू. ही कविता स्वत: कवींनी १८–३–५५ च्या नागपूर रेडियोवरील कविसंमेलनांत म्हटली.]

फोड नव्हे मी अंगावरचा
नव्हे वेदना मी सलणारी—
दु:ख नव्हे मी; जखम नव्हे मी
पंखाविण मी उंच भरारी !

जीवन मरणाच्या सीमेची
रेषा माझ्या अस्तित्वांतुन
गहन निळा अंत:पट सरतां
वरवर चढतो मी सूत्राविण !

कायेवाचुनि प्राण एक मी
मी तर जिह्वेविरहित वाचा
गंध असे मी; फूल नव्हे पण
फोड असावा मग मी कैचा ?

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यकणिका

कणाकणांतुन जनावनांतुन
दरवळला मधु गंध फुलांतुन !
        निघे सुन्दरी काव्य देवता
नऊ रसांचे कलश घेउन !
भावगंध ये हृदयीं डवरुन !!

—१—

मत्त कंचनी प्रमत्त कंचन
रतिमदनाचा विळखा घालुन
        पर्यंकावरी सु-रत-क्रीडा
जशी चालली नाग-नागिणी
उमङ्ग उठलें प्रीतिनर्तनीं !

—२—

पांच वाजले खुळखुळे दार
लगबग, लगबग गेले समोर
        कडी उघडली घ्याया वेणी
स्वागतांत अति अधिर बावरी
पण, पुढती 'मोत्या'ची स्वारी !

—३—

घोर अनिवार पडे दुष्काळ
माय पुसेना पोटचा बाळ
        बाळ लोटुनी, मिठी मारिली.
मृत्युला तिने तदा कडकडुन !
बाळ प्राशितो मृतशरिरीं स्तन !!

—४—

बेचाळीशीं भडकला हिन्द
जोहार पुकारिला बेधुन्द
        मृत्युंजय हादरला शंकर
पटापट पड गोळ्या झेलुन
देशभक्त चिचांबोरांसम !

—५—

पर्वा नच मम जावो प्राण
किल्ल्यावर फडकविन निशाण !
        हासत जाइन फासावरती
रोधूं न शके मज निश्चयापुन
रक्षुं स्वातंत्र्य वाहुनी प्राण !

—६—

नन्धनवनचें होतां स्मशान
भुतें बोलली प्रेतामधून
        "जा आंग्लांनो, सोडा भारत !"
शहारलीं अंगें आंग्लांची
होय मुक्तता भारतभूची !

—७—

नग्न-प्रात ललनांची दुस्थिति
मांस-शोणितें यमकपुरी प्रती
        चिखल माजला, दुर्गंधि भरली !
नीचपणाचा कळस जाहला
नेत्रिं न बघवें 'शिव शिव' बोला !

—८—

प्रिये एक म्यां स्वप्न पाहिलें,
पिपीलोकेनें करिशी गिळिलें,
        तर्जनी मुखीं धरि ब्रह्मदेव !
कूपामधि या गगन वितळलें
सुरवर, नरवर विस्मित झाले !

—९—

अंत पाहसी किति श्रीरंगा ?
राग पुरे, घे हृदि अनुरागा !
        ना तरि अर्पिन शिर पदकमलीं !
भक्तकामना सच्छिल पाहुन
सगुण-ब्रह्म दे मग आलिंगन !!

—तु. ना. काटकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दंवारलेल्या फिकट पहाटे!

दंवारलेल्या फिकट पहाटें
गवतावरचे नश्वर पातें
शाल पांघरुन तलम धुक्याची
रम्य कोवळें हास्य फुलवितें...!

दंवारलेल्या फिकट पहाटें
फुललेला प्राजक्त पाहचा
करतो स्पर्धा नक्षत्रांशीं
साज लेउनी शुभ्र फुलांचा...!

दंवारलेल्या फिकट पहाटें
मंद सुगंधित पश्चिम वारा
मायेचा निज हात फिरवुनी
नवसृष्टीला देइ दिलासा...!

...दंवारलेल्या फिकट पहाटें
व्यथित अंतरीं परी वाहते
जखम कालची होउन ताजी
आठवणींचे उसवित टाके...!

—रमेश वाबगांवकर

सावली

झाडाच्या　बुंध्याशीं
पेंगली　सावली
पेटल्या　उन्हाच्या
भोवती　मशाली
जळत्या　वायूचा
कातर　उसासा
कापीत　चालला
क्षितिजाची　रेषा !

फांदीच्या　गर्भात
कोवळी　पालवी
जीवन　संगीत
लयींत　चालवी
पंखाच्या　मायेत
पेंगलीं　पाखरें

वर्षंती　वरून
उन्हाचे　निखारे !

झाडाच्या　बुंध्याशीं
दुबली　सावली
श्वासात　कण्हत
बिचारी　पेंगली
झिंगलें　जीवन
भंगल्या　दुपारीं
घर्मात　विरल्या
संगीत　लहरी

बिचारी　सावली
कण्हते　घर्मात
फांदींत　उमले
जीवन　संगीत
नवीन　आकांक्षा
नवीन　जीवन
नवीन　पालवी
नवीन　दर्शन !

पेटली　दुपार
हळूच　सरली
विझले　निखारे
धग　ओसरली
हसली　सावली
संध्येच्या　रंगांत
जीवन　जागलें
फांदीच्या　गर्भात !

जागलें　जीवन
फुलला　मोहर
रानांत　नाचली
गंधाची　लहर
फळली　तपस्या
वेदना　मिटली
बुंध्याच्या　कुशींत
सावली　हसली !

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या खिडकींतून

ह्या खिडकींतून–
दिवसाच्या मल्लाने
समुद्रांत फेकलेला
सूर्याचा गोळा
अनेक वेळां मीं पाहिला
ह्या खिडकींतून––
इस्तंबूलच्या आगीच्या
ज्वालांची लवलवती लाली
अचित मला दिसली
ह्या खिडकींतून––
घामाने ओलाचिंब झालेला
गिट्टी–फोड्या पाहिला मीं
चिकार गर्दी कधि रस्त्यावर
सडक पाहिली कधी रिकामी !
ह्या खिडकींतून––
प्रथम रसिकचें प्रथम आगमन
मैफलींतल्या कुठलें गाणें
रेंगाळत हो इथे विसर्जन !
ह्या खिडकींतून––
गौतमबुद्धापरी चुकुन मी
प्रेत पाहिलें सुकून गेलें
जीवन–यात्रा अशी निकामी !
ह्या खिडकींतून—
रोज सकाळीं मजला दिसते
किलकिलते ते उघडत डोळे
चिखलामधलें कमल उगवतें !
ह्या खिडकींतून—
पाहत मी नित विश्व–प्रदर्शन
नको यशोदे गर्व करूं तूं
मजला खिडकीचें आकर्षण !
ह्या खिडकींतून—
रोज रोज विश्व–रूप बघत असतों
दूर अनंतांतलें
गूढ मी उकलत बसतों !
ह्या खिडकींतून !

— विनायक पाठक

कोरीव लेणीं

" मरणोत्तर स्वर्गाचें वैभव;
जिकलास तर पृथ्वीवल्लभ
होशिल "—वदला पार्थालागुन
योगेश्वर तो राधावल्लभ

पार्थहि होता जाणुन पुरता
अचाट भगवंताची शक्ति
विधिलिखिताची नव्हती पर्वा
मरणाची मग कुठली भीति !

धनुर्धरांचा खंदा वीर
मायापाशीं पडला दारुण
गलितधैर्य तो विकळ होउनी
प्रत्यंचेला लावि न बाण

रणभूमीवर नर–नारायण
शिष्य नरोत्तम गुरु श्रेष्ठतम
गीतामृत विश्वास ओपिलें
श्रुतिस्मृतींचें करुनी मन्थन

कुठे अम्ही अन कुठे धनंजय
कृष्ण पाठिशीं हवा कशाला ?
कर्तव्याची जाणिव जळती––
उरीं; उसासे शमवायाला

स्व-भू वैभव हवें कुणाला
मध्याह्नीचा प्रश्न सुटाया
कर्तव्याची करवत चाले
जीवन अमुचें आकाराया

पापाचीं वा पुण्याची वा
नका ऐकवूं दुबळीं गाणीं
सवड कुणाला ऐकायाची
वाट पाहती गिरण्या–खाणी

कुदळ–फावडीं अमुच्या हातें
कातळांत जें लिहिती कोरुनि
गीताई ती अमर आमुची
तीच आमुचीं कोरीव लेणीं !

––गणेश पाठक

श्री नामदेवांची तीर्थावळी

श्री रा. ना. घाटोळे

लेखांक १

श्री संत नामदेवांच्या सर्व वाङ्मयांत संशोधनाच्या दृष्टीने त्यांच्या 'तीर्थावळी'ला फार महत्व आलेलें आहे. नामदेवांच्या नांवावर उपलब्ध असलेल्या ह्या प्रकरणांत एकूण ६१ अभंग आलेले सर्वच गाथ्यांत आढळतात. क्वचित् थोडे पाठभेद सोडून दिल्यास बहुतेक गाथ्यांतील अभंग सारखेच आहेत. नाही म्हणावयास गोंघळेकरांच्या गाथ्यांत १० व्या अभंगानंतर आवटेप्रतीप्रमाणे ११ वा अभंग न येतां आवटेप्रतींत आलेला १५ वा अभंग सुरू होतो. हा लहानसा भेद सोडून दिल्यास बाकी सर्वच गाथ्यांत सारखेपणा आहे. ह्या ६१ अभंगांपैकी शेवटले तीन अभंग उर्वरित ५८ अभंगांच्या सांध्याशीं नीट जुळत नोहीत. अभंगांचा हा क्रम सुसंगत वाटत नाही अशी कबूली श्री ह. भ. प. सुबंध ह्यांनीहि दिलेली आहे. (नामदेवांची सार्थ गाथा, भाग १, पृ. ३६६.) व ही गोष्ट मोठी महत्वाची आणि सूचक आहे. ती कशी हें आपण पुढे पाहूंच. दुसरी गोष्ट ही की तीर्थावळीच्या एकूण ६१ अभंगांपैकी फक्त २० च अभंग काय ते तीर्थयात्रेचें वर्णन करणारे आहेत. उरलेले ४१ अभंग हे पंढरपूरला झालेल्या मांवद्याचें वर्णन करणारे आहेत. ह्या २० अभंगांतही ज्ञानदेवाची भक्तिमार्गाची पूर्णता होण्याकरता अजून त्यांनी एक पायरी कशी गाठली पाहिजे याचीच चर्चा केली आहे व सुमारें ५ अभंग तर नामदेवांनी

"गडगडित कूप उदके ओसंडला ।
कल्पांतीं खवळला सिंधु जैसा ॥१८–११॥"

ह्या प्रसंगाचे आहेत. असो.

संतकाव्य हें त्यांच्या अंतरंगाचें सूचक आहे काय ?

नामदेव वाङ्मयांत तीर्थावळीला येवढें महत्व देण्याचें एक कारण असें की तिच्यांत नामदेवांच्या अंतरंगाचें खरें चित्र उमटलें आहे व तिच्यावरूनच नामदेवांची खरी योग्यता कळून येते असा समज फार मोठ्या प्रमाणांत आहे. म्हणून प्रथमतः ह्याच समजुतीचा विचार करूं.

कवींच्या काव्यावरून कवीच्या अंतःकरणाचा बोध होतो हा समज पाश्चात्य लेखकांनी प्रवृत्त केला आहे. तिकडचें कविजीवन, काव्यहेतु आणि काव्य ह्याकडे पाहतां कदाचित तें खरेंही असूं शकेल; परंतु भारतांत आणि विशेषतः महाराष्ट्रांतील संतांच्या बाबतींत हा सिद्धांत मुळीच लागूं पडत नाही. तसें झाल्यास 'गीत गोविंद' रचणाऱ्या कवीला जगन्नाथपंडित किंवा रामजोशी ह्यांच्याप्रमाणे विलासी व रंगेल समजावें लागेलच; परंतु त्याबरोबरच राधा–दामोदराच्या माधुर्यभावाचीं व रासक्रीडेचीं रसाळ वर्णनें करणाऱ्या अनेक संत कवींवरही तीच आपत्ति येऊन पडेल. वस्तुतः सर्वच संतकवींचें जीवन सामान्य माणसाहून वेगळ्या प्रकारचें होतें. म्हणून सामान्य माणसांना लागू पडणारे व्यावहारिक सिद्धांत ह्या विशिष्ट वर्गांतील संत कवींना लागू पडणें शक्य नाही. त्यांच्या आयुष्याचा रथच मुळीं सामान्य लोकगंगेच्या उलट दिशेने भ्रमण करीत असल्यामुळे त्यांचा मागोवा घेण्याकरतां आपणालाहि प्रचलित लोकरहाटीचा मार्ग सोडून वेगळ्याच दिशेने विचार करावा लागेल; नाही तर संतकाव्यांत पदोपदीं आढळणाऱ्या, बाह्यतः

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परस्पर विरोधी परंतु आत पूर्ण सुसंवादी अशा विचारांची संगति लावणें अवघड होऊन बसेल. उदाहरणार्थ, परमेश्वराचें एकत्व व अनेकत्व, निर्गुणत्व व सगुणत्व एका बाजूला "संसारा आगी आपुलेनी हातें। लावोनी मागुतें पाहूं नये" (तुका.) असा संसार जाळण्याचा उपदेश, तर दुसऱ्या बाजूला "नको सोडूं अन्न, नको सेऊं वन। चित्तीं नारायण सर्व भोगी" (तुका.) असा पूर्ण व्यवहारवादी उपदेश, एकीकडे "प्रस्तराचा देव बोलत भक्ताते। सांगते ऐकते मूर्ख दोघे" (नामदेव आवटे प्रत, १३९३) व दुसरीकडे 'जेऊनिया हातीं देवें दिधली वाटी' (नाम. १२४७) असा प्रत्यक्ष देवमूर्ति नैवेद्य खाऊं लागली असा उल्लेख, एका बाजूला तीर्थयात्रेवर व व्रतवैकल्यें ह्यावर कठोर प्रहार, तर दुसरीकडे पंढरीची यात्रा व एकादशी व्रताचें बंधन इत्यादि परस्पर विरोधी कोडयांचा उलगडा होणें कठीण आहे.

प्रायः सर्वच संतकवींची कविता प्रासंगिक व लोकशिक्षेकरतां होती. 'काव्याकरतां काव्य' किंवा 'कलेकरतां कला' हा आधुनिक सिद्धांत त्यांना माहित नव्हता. त्यामुळेच त्यांच्या काव्यांत मानवी अंतःकरणांतील सर्वच भाव चित्रित झाले आहेत; तरीहि हे सर्व त्यांनी आपल्या अनुभवावरूनच लिहले आहेत असें निदान करणें चूक आहे. अगदी कांहीं थोडें काव्य टाकलें तर त्यांची बहुतेक सर्व काव्यरचना कीर्तन किंवा भजनाच्या निमित्ताने तत्कालीन प्रसंगास धरून झालेली आहे. हें लक्षांत न ठेवलें तर काय आपत्ति होते पहा. "पराविया माऊली रुखमाई समान। हें गेलें नेमून ठायींचेची।" असें म्हणणाऱ्या श्री तुकोबारायांची "परस्त्रीशीं म्हणतां माता। चित्त लाजवितें चित्ता॥" अशी अवस्था कधी होती? 'अधिकार तैसा देऊं उपदेश' हें तर संत काव्याचें मूख्य सूत्र होतें. गीता श्लोकाच्या निमित्तानें दासबोधांत ही गोष्ट फार चांगली समजावून सांगितली आहे. परमेश्वराचें स्वरूप, अक्लेद्य, अच्छेद्य, अदाह्य आहे असें गीतेंत म्हटलें आहे; परंतु त्याच गीतेने "अश्वत्थ सर्व वृक्षाणाम्" असे उद्‌गार काढून पिंपळ सुद्धा माझेंच स्वरूप आहे असेंहि म्हटलें आहे. तेव्हा त्याचें खरें स्वरूप कोणतें अशी शंका आहे व तेथेच समर्थांनी 'खडे मांडून शिकविला। साधन मार्ग।' हें संतकाव्याचें आद्यतत्त्व विशद केलें आहे.

हा सर्व विस्तार करण्याचें कारण हेंच की संतकाव्यांतून त्यांचें जीवनरहस्य अथवा अंतरंग कळतें हा समज सर्वस्वी खरा नाही. जी गोष्ट सर्व संतांची तीच नामदेवाची! म्हणूनच असें म्हणावें लागतें की नामदेवांच्या तीर्थावळींतून त्यांचें अंतःकरण प्रतिबिंबित होतें ह्या प्रतिपादनांत खासच अतिशयोक्ति आहे. असो. आता खास तीर्थावळीकडे वळूं.

तीर्थावळीसंबंधीं तीन संभवनीय तर्क

तीर्थावळीसंबंधी थोडा बारकाईने विचार केला असतां मुख्यत्वेंकरून तीन कल्पना संभवनीय वाटतात. (१) तीर्थावळी प्रकरण जसेंच्या तसें म्हणजे संपूर्ण नामदेवांचेंच असावें. (२) तें नामदेवांचें मुळींच नसावें. (३) त्यांतील कांही भाग नामदेवांचा असावा व कांही भाग मागाहून जोडण्यांत आला असावा. संतवाङ्मयांत नामदेव नांवाचे अनेक कवि झाल्यामुळें त्यांच्या काव्यांचा बराच सावळागोंधळ झाला आहे; तेव्हा त्यांचा निवाडा करून खास नामदेवांचे—म्हणजे जनाईच्या नामदेवाचे अभंग कोणते हें निश्चित करणें अपरिहार्यच आहे. हें कार्य कितीही दुर्घट असलें तरी शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीने तें आवश्यक आहे; आणि तशा प्रकारचा उद्योग प्रस्तुत लेखकाने सुरुहि केला आहे. त्यासंबंधीं पुढे स्वतंत्र लिखाण प्रसिद्ध होईल. येथे फक्त तीर्थावळीपुरताच विचार करावयाचा आहे.

तीर्थावळी नामदेवांची नसावी; कारण त्यांतील वर्णन प्रत्यक्षाशीं विसंगत आहे

आजपर्यंत बऱ्याच लेखकांनी नामदेव व नामदेव वाङ्मय ह्यावर चर्चा केली आहे. त्यांपैकी बहुतेकांनी तीर्थावळी हें प्रकरण नामदेवांचें आहे किंवा नाही अशी शंका प्रकट करीतच ती त्यांचीच आहे असें गृहीत धरून तिच्यावरून आपलीं अनुमानें बसविलीं आहेत. श्री पांगारकर, प्रा: दांडेकर, डॉ. कोलते व नुकतेच परवा प्रसिद्ध झालेल्या श्री मुळेकृत नामदेव चरित्राचे व्यासंगी प्रस्तावना लेखक श्री. र. ह. घाळुंकर ह्यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तीं नामदेवांची आहे असा निष्कर्ष काढून आपले लेख सजविले आहेत. परंतु आम्हाला असें वाटतें की तीर्थावळी हें प्रकरण आद्य नामदेवांचें नसावें; निदान तें सबंध तरी नामदेवांचें नसावें किंवा हल्ली समजलें जातें त्याप्रमाणे तरी तें नसावें. एक तर तीर्थावळीमध्ये असा बराच भाग आला आहे की जो इतिहास संशोधनाच्या कक्षेंत येऊ शकणार नाही. (उदा. विठ्ठलाने भूतलावरील सामान्य माणसाप्रमाणे नामदेवाशीं केलेला व्यवहार, विठ्ठलाचा रुक्मिणीशीं संवाद, ब्राह्मण भोजन, मावंदें, देवाने नामदेवांचें उच्छिष्ट स्वीकारणें, पांडुरंगाचें प्रायश्चित्त इत्यादि). "तंव गडगडित कूप उदकें ओसंडला । कल्पांतीं खवळला सिंधु जैसा ॥" हा अनुभव कदाचित इतिहासाच्या प्रांतांत येऊं शकेल; परंतु तीर्थे करून आल्यावर झालेल्या मावंद्याची हकीकत ही प्रत्यक्ष सृष्टींतील आहे असें हल्लीचा कोणता इतिहासशास्त्रज्ञ म्हणावयास तयार होईल? अशी स्थिति असल्यामुळे असें म्हणणें भाग पडतें की एक तर हें सारें प्रकरण एकट्या नामदेवांचें नसावें; किंवा त्यांत मागाहून अद्‌भुताचें मिश्रण झालें असावें अथवा तें सारें त्यांचेंच असल्यास ती प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट नसून भावयोगांत येणाऱ्या अनेक स्वसंवेद्य अनुभवांच्याप्रमाणे तो एक केवळ वैयक्तिक असा भावसमाधींतील अनुभव असावा. आणि समजा ती प्रत्यक्ष घडलेली घटना आहे असें म्हटलें तरीहि तें प्रकरण खुद्द नामदेवांच्या हातचें असावें असें वाटत नाही. कारण तीर्थावळीचें सूक्ष्म परीक्षण केल्यास त्यांतील असंभाव्यता व विसंगति पदोपदीं वाचकाला बोचल्याशिवाय राहत नाही व हें सिद्ध करण्याकरतां अनेक पुरावे देतां येतील. त्या प्रत्येकाचा क्रमशः विचार करूं.

इतक्या अल्पावधींत संपूर्ण तीर्थें करणेंच अशक्य

तीर्थावळीसंबंधीं एक गोष्ट अशी लक्षांत ठेवली पाहिजे की हल्ली समजलें जातें त्याप्रमाणें तिच्यावरून श्री ज्ञानेश्वरादि संतांनी सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला असें मुळींच सिद्ध होत नाही. ह. भ. प. सुवंध ह्यांनी तीर्थयात्रेसंबंधीं उपलब्ध झालेलें एक चोपडेंही प्रसिद्ध केलें आहे. (नामदेवांची सार्थ गाथा, भाग १ परिशिष्ट) अर्थात् तीर्थावळीच्या प्रसिद्ध अभंगांत असलेले जी काव्यात्मकता व वाक्चातुर्य ह्या चोपड्यांत नाही. त्यांत नुसती तीर्थस्थळांची एक लांबच लांब यादी आहे. त्या चोपड्याकडे संशोधनाच्या चष्म्यांतून पाहिल्यास असेंच दिसून येतें की त्यांत कल्पनेचें मिश्रण किती तरी झालेलें आहे; आणि आश्चर्याची गोष्ट ही की ह्या चोपड्याच्या शेवटीं "तिर्थावळी संपुर्ण मस्तू सके १५०३ राक्षसनाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध सप्तमिस संपुर्ण—मस्तू श्री. हस्तू" असा उल्लेख आहे; आणि 'नामा म्हणे माझे सकळ मनोरथ पुरले देखोनि पंढरी" असेंही म्हटलें आहे. या तीर्थावळींची अभंग संख्या १४ असून "नामा म्हणे" हा उल्लेख फक्त शेवटींच आलेला आहे. शके १५०३ मध्ये हयात असणारे नामदेव कोणते हाहि प्रश्न विचार करण्यासारखा आहे. परंतु येथे आपणास त्या चोपड्याचा विचार करावयाचा नसून नामदेवांच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या 'तीर्थावळी'चाच विचार करावयाचा आहे.

आपल्या या तीर्थावळीच्या अभंगांत आलेल्या तीर्थयात्रेचा नुसता क्रम देखील पाहिला तरी ती आद्य नामदेवांची नसावी हें सहज सिद्ध होतें. यात्रा करणारी मंडळी वाटेल तशी स्वच्छंदाने भटकत नसतात. आणि पूर्वीच्या काळीं, जेव्हा दळवळणाचीं साधनें सुलभ नव्हतीं, अशा वेळेला तर विशिष्ट क्रमानेच यात्रा करावी लागे. वरील चोपड्यांत ओंकारेश्वर करून मंडळी भीमाशंकराला आली आणि तेथून महांकाळेश्वराला गेली इ. वर्णन आहे. कुठे ओंकारेश्वर व कुठे भीमाशंकर! किती असंबद्धता ही! परंतु असेच असंबद्ध उल्लेख या नामदेवांच्या समजल्या जाणाऱ्या तीर्थावळीच्या अभंगांतहि आहेत. म्हणूनच ती नामदेवाची असावी यावर विश्वास बसत नाही. या तीर्थावळीच्या अभंगांत "पाहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या" (१६) असा स्पष्ट निर्देश केला आहे, परंतु त्या शब्दांचा अर्थ उत्तरेकडील मोक्षपुऱ्या असाच करावा लागतो. साऱ्या मोक्षपुऱ्या असा अर्थ घ्यावयाचा म्हणजे कांची दक्षिणेंत मद्रासजवळ राहते तिची वाट काय? मोक्षपुऱ्या कोणत्या हें प्रसिद्धच आहे. "अयोध्या मथुरा माया काशी कांची,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अवंतिका । पुरी द्वारावती चैव सत्यैते मोक्षदायिका ।।" परंतु उत्तर हिंदुस्थानच्या मोक्षपुऱ्या करून दक्षिणेस कांचीला भेट देऊन पंढरपुरला परत यावयाचें म्हणजे अगदी घोड्यावरून प्रवास केला तरी कित्येक वर्षें लागतात. सिंहाऱ्या गुहेंत जाऊन त्याचे दात पाडावेत त्याप्रमाणे औरंगजेबाला फजित करून आग्र्याहून निघालेले शिवछत्रपति मथुरा, काशी, गया करून जगन्नाथाचें दर्शन घेऊन गोंडवनांतून गोकर्णाला गेले आणि तेथून रायगडास आले असें वर्णन आहे. तळ हातावर शीर घेऊन केलेला हा धावता प्रवास संपवावयासही त्यांना दहा महिने लागले. मग भारतवर्षाच्या साऱ्या मोक्षपुऱ्या आणि तीर्थे यात्राभावाने करणाऱ्या संत मंडळाला किती तरी जास्त वेळ लागणें भाग आहे. परंतु प्रचलित साऱ्या माहितीप्रमाणें शके १२१२ त ज्ञानेश्वरी समाप्त झाली. त्यानंतर श्री ज्ञानेश्वर महाराजांचें पंढरपुरीं गमन, तेथेच निघालेला तीर्थयात्रेचा बूट व तयारी आणि तीर्थावळीची समाप्ति शके १२१७ मध्ये झाली. म्हणजे एकंदर यात्रेस जेमतेम चार पांच वर्षें मिळतात. त्या काळाचा विचार केला तर तीर्थयात्रेस हा काळ फारच थोडा ठरतो. श्री आळतेकरांनी आपल्या 'ज्ञानदेव' चरित्रांत हीच शंका उपस्थित केली होती. सदर ग्रंथांत ते म्हणतात, "पश्चिम प्रभास आदि करोनी द्वारका । पाहिल्या सकळिका मोक्ष पुऱ्या ।। पंथीं पावन तीर्थें पाहिलीं सकळिकें !... हें विधान फारच मोघम माहे. त्यांत कोणत्याहि यात्रेचें वर्णन नाही. सर्व मोक्षपुऱ्या म्हणजे काय ? द्वारकेचा उल्लेख दोन वेळां माला आहे...... हा अभंग लिहणाऱ्याला तीर्थयात्रेची प्रत्यक्ष माहिती फारच थोडी असावी असें म्हणणें भाग आहे" (सदर पृ. ९३). विचारांतीं हा काळ खरोखरच फार थोडा आहे हें कुणालाहि मान्य होऊं शकेल. आणि विशेषतः "कीर्तनद्वारां हिंदुस्थान देश जागृत करून हिंदुधर्माचा जाज्वल्य अभिमान सर्वांच्या रोमरंध्रीं भिनविण्याचा" हेतु पोटांत ठेवून केलेल्या तीर्थयात्रेस हा काळ तर केवळ अशक्य आहे. (सुबंधकृत नामदेवांची सार्थ गाथा पृ. ३) तात्पर्य हेंच की एवढ्या अल्पावधींत एवढा दीर्घ प्रवास यात्राभावाने करणें शक्यच नाही; आणि देशजागृति करणें तर मुळीच शक्य नाही. असलें असंभाव्य वर्णन तीर्थावळींत आहे म्हणूनच आम्ही म्हणतों की हे तीर्थावळीचे अभंग आद्य नामदेवांचे नव्हत.

तीर्थावळीचें अंतरंग व त्यांतील विसंगति

तीर्थावळीचें अंतरंग परीक्षण केलें तरीहि असें दिसून पडतें की ती नामदेवांची नसावी; निदान तिच्यांत मागाहून तरी पुष्कळ भर पडलेली असावी. तीर्थावळीचा सरळ उद्देश इतर साधनांपेक्षा शुद्ध भक्तीचें श्रेष्ठत्व दाखविण्याचा आहे. परंतु त्याबरोबरच नामदेवांचेंहि श्रेष्ठत्व दाखविण्याचा आहे. मागे हें सांगितलेंच आहे की त्यांतील ६१ अभंगांपैकीं केवळ २० अभंग तीर्थयात्रेचे वर्णनपर आहेत व ४१ अभंग मावंद्याचें वर्णन करणारे आहेत. ह्या २० अभंगांतही सुमारें ५ अभंग "तंव गडगडीत कूप उदकें गोसंडला । कल्पांतीं खवळला सिंधु जैसा ।। १८ × ११ ।।" ह्या प्रसंगाचे आहेत. आमच्या मतें ह्या गडगडीत कूपाच्या घटनेचा अर्थ आजपर्यंत टीकाकार जसा लावीत आले आहेत तसा नसून त्यांत कांही वेगळा परंतु खोल व गंभीर अर्थ असला पाहिजे. म्हणून तो कोणता हें प्रथम पाहूं.

योग मार्ग व भक्ति मार्ग

संत नामदेव हे परिपूर्ण व श्रेष्ठ भक्त समजले जातात व तें पूर्णपणें खरेंही आहे. एवढेंच नव्हे तर वारकरी पंथांत कळसाप्रमाणे उठून दिसणारे व आपल्या भक्तितेजाने तळपणारे श्री संत तुकाराम हे श्री नामदेवांचेच अवतार मानले जातात. नामदेव ज्याप्रमाणे भक्तिमार्गाचे अध्वर्यु समजले जातात तसेंच ज्ञानेश्वर हे योगमार्गाचे आचार्य समजले जातात. परंतु वारकरी पंथाने त्यांना आपल्या वारकरी सांप्रदायाचे नेते म्हणून शिरोधार्य मानलें तें ते केवळ योगीराज होते म्हणून नव्हे. धार्मिक इतिहासांत आद्य शंकराचार्यांचें जें स्थान तेंच वारकरी पंथांत ज्ञानेश्वरांचें ! भक्ति आणि योग ह्या दोन्ही मार्गांचे ते आचार्य व प्रभु होते. प्रत्यक्ष नामदेवांनी "धन्य ज्ञानदेव योग साधूनिया । भक्ति आचरोनिया दावी लोकां" (आवटे २०९९) अशी कबूली दिली आहे. तसेंच

तीर्थावळीवरून सुद्धा श्री ज्ञानेश्वर हे भक्तिमार्गांत कोणत्याही प्रकारें कमी नव्हते हें दिसून पडतें. तीर्थावळींत नामदेव ज्ञानदेवांना म्हणतात–" पूर्व पुण्य माझें फळाशीं हें आलें । प्रत्यक्ष भेटले पांडुरंग ॥ संसारीं आसक्त माया मोहे रत । तापत्रय संतप्त झाले जीव ॥ ऐसिया पतितांचा करावया उद्धार । या लागीं अवतार तुमचा जगीं ॥ तीर्था० १ ॥ एवढेंच नव्हे तर, प्रत्यक्ष पांडुरंगांनीहि 'प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा ॥तीर्था० ५॥ म्हणून गौरविलें आहे. आणि 'सर्वज्ञानाचा रावो, आत्मा ज्ञानदेवो' असें प्रशस्तिपत्रक वहाल केलें आहे. ज्ञानदेवांनीसुद्धा नामदेवाच्या उत्कट भक्तिभावाविषयी असेंच गौरव केलें हेंहि स्वाभाविकच आहे. विवेकानंदांचें असेंच गौरव श्री रामकृष्ण परमहंसांनी केलेलें आपणास दिसतें. त्यांत नामदेवांचा जितका थोरपणा आहे त्यापेक्षाही आपल्या भावी शिष्याविषयीचें (वा प्रशिष्याविषयीचें) अलोट असें ज्ञानेश्वरांचें प्रेम दिसून येतें. खुद्द भगवंतांनीहि 'प्रत्यक्ष परब्रह्म' किंवा 'आत्मा ज्ञानदेवो' अशी प्रशस्ति करण्यासारखें ज्ञानेश्वरांत विशेष काय होतें ? हा विशेष म्हणजे श्री ज्ञानेश्वर हे भक्तिमार्गाची पूर्तता पावलेले असूनही शास्त्रज्ञ होते. ते भक्तहि होते व ज्ञानीहि होते. (ह्याविषयीं जास्त विवेचन पुढे स्वतंत्र लेखांत केलें जाईल.) म्हणजे त्यांच्याजवळ दोन्ही मार्गांची सिद्धि होती; आणि म्हणूनच त्यांना वारकरी पंथाचा अध्वर्य्यु होण्याचा बहुमान प्राप्त झाला. भारतवर्षाचा पडता काळ जेव्हापासून सुरू झाला तेव्हापासून शास्त्रज्ञांची संख्या कमी कमी होत गेली व ज्ञानेश्वरांच्या काळीं तर अशी वेळ आली होती की, दोघांचीहि दुर्मिळता जाणवूं लागली होती, व ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाच्या द्वारें भक्तिमार्गाचाच पुरस्कार करावयाचा असला तरी पोटांत शास्त्रमार्गहि जगवावयाचा होता. ज्ञानेश्वर हे ज्ञानी व श्रेष्ठ योगशास्त्रज्ञ होते व म्हणूनच तुकारामासारख्या स्पष्ट व फटकळ बोलणाऱ्या संतांनीही स्वतःला 'पायींची वहाण' असें ज्ञानेश्वरांच्या बाबतींत म्हणवून घेतलें आहे. स्पष्ट व निर्दय वृत्तीचे संत विनाकारण कुणाचाही गौरव करणार नाही हें उघड आहे.

वस्तुतः योग व भक्ति किंवा ज्ञान व भक्ति हे दोन्ही एकाच परमेश्वराप्रत पोचणारे दोन मार्ग आहेत. दोहोंचेंहि ध्येय एकच म्हणून त्यांत श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद पडूं शकत नाही. तथापि ह्या दोन मार्गांत भेद आहे. तो भेद म्हणजे केवळ सुलभ–कठीणपणाचा नाही तर दुसराहि महत्त्वाचा फरक आहे. तो असा की भक्तिमार्गाने मिळणारें सामर्थ्य हें स्वयंभू नसतें. तें दुसऱ्याच्या कृपेवरच अवलंबून असतें म्हणून दुसऱ्याच्याच तंत्राने तें वापरतां येतें. उलट योगसामर्थ्य वा तंत्रसामर्थ्य हें स्वयंभू व स्वतंत्र असतें व तें स्वेच्छेनुसार वापरतां येतें. वर सांगितल्याप्रमाणें ज्ञानेश्वर हे ज्ञानी व योगशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांना तहान भागविण्याकरता प्रत्यक्ष पांडुरंगाला कष्टविण्याची गरज नव्हती. स्वतःच्या लीलेनेच ते स्वतः ती शांत करूं शकत होते आणि नामदेवाला मात्र तेवढ्याकरता प्रत्यक्ष पांडुरंगाला कष्ट द्यावे लागले. एका दृष्टीने हा भक्तिमार्गांतील उणेपणा आहे व हा साधन मार्गांतील उणेपणा नामदेवाच्या ध्यानांत आणून देऊन त्यांची अपरिपक्वता घालवावी हाच तीर्थावळीचा हेतु होता हें तर खुद्द तीर्थावळींतच म्हटलें आहे. (अज्ञानाचा भाग होता माझे मनीं । हिंडलों म्हणोनी दारोदारीं ॥) तीर्थावळींत हा संस्कार त्यांच्या मनावर झाला हें– "नामा म्हणे सोडा बाई । ज्ञानदेव सर्वांपायीं ॥ " ह्या त्यांच्या उद्गारावरून दिसून येतें.

येथे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे की संतांच्या वाङ्मयाकडे व चरित्राकडे बारकाईने पाहिल्यास असें स्पष्ट दिसून येतें की सर्वच संतांनी विशिष्ट अवस्थेनंतर योगाभ्यास केलेला आढळून येतो. उदाहरणार्थ, नामदेवांचे पुढील अभंग पहा—

"साधनाच्या माजीं एक गजराजू ।
साधी त्यास उजू होय पहा ॥
नासिकाचें वारें कोंडूनिया प्राणें ।
उफराटे जाणें उर्ध्वपंथें ॥
......गोल्हाट भेदिसा कोल्हाटीच नाही ।
विठोवाची ग्वाही नामा म्हणे
॥ २०९५ आवटे प्रत ॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा

'नामा म्हणे आम्ही काकी पैं बोळली ।
मत्रावी दिघली दोहावया' (२०९७)

'समाधी साधन अखंड उन्मनी ।
औटपीठ ध्वनि नाद होय ॥
नामा म्हणे तेथे चौऱ्या ज्या रंगल्या ।
अरंग मिरविल्या संतसंगें ॥ (२०९०).

जनीचे अभंगहि हीच साक्ष देतात. उदाहरणार्थ—

"रक्तवर्ण त्रिकुटस्थान । श्री हार पाहे श्वेतवर्ण ॥
शामवर्ण तें गोल्हाट । निळबिंदु औटपीठ ॥
वरि भ्रमर गुंफा पाहे । दशम द्वारीं गुरु आहे ॥
नवद्वाराने भेदुनी । दशम द्वारीं गेली जनी ॥
(आवटे प्रत १९९)

"अनुहात घंटा श्रवणीं ।
ऐकुनी विस्मय जहाली जनी ॥ (२००).
चारी वाचा कुंठित जाहाली ।
सोहं ज्योत प्रकाशली ॥ (२०१).

(ह्याशिवाय अभंग क्रमांक २०२, २०३ व २०४ मध्येही योगाचे उल्लेख आहेतच.) "ऊर्ध्वमुखें आळविला सोहं शब्दाचा नाद" ही तुकारामोक्ति तर प्रसिद्ध आहेच. ह्यावरून असें सिद्ध होतें की नामस्मरण हें जरी वारकरी सांप्रदायाचें महत्वाचें साधन असलें तरी विशिष्ट अवस्थेनंतर सर्वच संतांना योगांतील कांही साधनांचा अभ्यास करावा लागत असे; व हीं अंतरंग साधनें केल्याशिवाय पूर्णता किंवा संतपदवी प्राप्त होत नसे. नामदेव-तुकारामांनी ज्ञानेश्वराला परमेश्वर वा अवतार म्हणून संबोधलें आहे तें ज्ञानेश्वर हे योगसागर असल्यामुळेच ! व त्यामुळेंच नामदेव, तुकाराम, जनाबाई, सेना, गोरा आदि सर्व संतांना वंद्य व पूज्य होऊन बसले आहेत. आता तीर्थावळींत ज्ञानेश्वराविषयी कोणता भाव प्रकट केला आहे तें पाहूं.

तीर्थावळींतील अंहभावदर्शक उद्गार व नामदेवांची अपक्वता

तीर्थावळीचा पुढील भाग भक्तिभावाला फाटा देऊन केवळ कर्मठपणावर जास्त भिस्त ठेवणाऱ्या शास्त्री-पंडितांची कानउघाडणी करण्याकरिता आहे. त्यावरून नामदेवांच्या जीवनासंबंधीं व त्यांच्या मानसिक खळबळी संबंधीं जीं अनुमानें काढलीं जातात त्यांचा पुढे स्वतंत्र विचार करूं. एवढी गोष्ट मात्र खरी की जरी तीर्थावळींत पूर्वी प्रतिपादन केलेल्या दोन प्रवाहांतील लोकांना बोध असला तरी तिचा मुख्य उद्देश नामदेवांचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्याचा आहे. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांनी त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें (चरणासीं लागला ज्ञानदेव), त्यांची पायधूळ कपाळास लावली इतकेंच नाही तर प्रत्यक्ष विठोबा देखील त्या पायधुळीचा हावभरू होऊन त्याच्या मागे हिंडत होता (नामयाच्या पाठीं चाले केशवराज । लागावया रज चरणींचें ॥) इ० वर्णन स्पष्टच आहे. नामदेवांची नम्रता, लीनता व अहंताशून्यता प्रसिद्धच आहे; तेव्हा विठोबाचे एकनिष्ठ भक्त, संतांचे दासानुदास, पांडुरंगाचे एक नम्र पाईक स्वतःच्या आराध्य दैवताबद्दल असले अहंमन्य उद्गार कसे काढूं शकतील ? नामदेवासारख्या थोर अधिकाराच्या विभूतींना असले दर्पोद्गार काढणें कदापिहि शक्य नाही. हेंच म्हणणें त्यांच्या ज्ञानेश्वराविषयींच्या उद्गारांना लागूं होईल. "तिन्ही दैव जैसें परब्रम्हीचे ठसे" (९०९) "ज्ञानराज माझी योग्याची माऊली" (९१२) "देवाजीनें घेतला त्वरें अवतार । म्हणती ज्ञानेश्वर तया लागीं" "नामा म्हणे माझा ज्ञानराज प्राण । तयाचे वंदीन चरण मी" "ज्ञानदेव हाचि देव । ज्ञानदेवीं धरलिया भाव । ज्ञान होईल जीवा सर्व । यांसी संदेह नाही ॥ (समाधि-महिमा ९९१)—हे नामदेवांचे अत्यादर दाखविणारे उद्गार कुणीकडे व तीर्थावळींतील अहंभावदर्शक अभंग कुणीकडे ? "सद्गुरूंचे पायीं देहासी अर्पिता । तत्काळ मुक्तता हातां येते" (१४०३) अशी ज्याची श्रद्धा ते नामदेव आपल्या गुरू श्रीज्ञानेश्वर ह्यांच्या बाबतींत असले उद्गार कधी तरी काढतील काय ? नामदेवांच्या इतर अभंगांतील उद्गारावरून त्यांना ज्ञानेश्वराबद्दल प्रत्यक्ष पांडुरंगाइतकाच आदर व पूज्य-भाव होता हें आम्ही वर सांगितलेंच आहे. (फक्त नामदेवांना नव्हे तर सर्व महाराष्ट्रीय संतांनी ते विष्णुचे अवतार होत असें म्हटलें आहे.) आणि ह्या त्यांच्या पूज्यभावाशीं हे तीर्थावळींतील उद्गार पूर्णपणें विसंगत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटतात. म्हणून ह्या आत्मप्रौढीदर्शक उल्लेखांवरून ती नामदेवांची नसावी असें आम्हांस वाटतें.

ह्यावर कोणी अशी शंका घेतील की तीर्थावळींत हे अभंग त्यांच्या पूर्वायुष्यांतील अथवा गुरुकृपा होण्यापूर्वीचे असावेत. त्यावेळीं त्यांनी ज्ञानेश्वराची योग्यता जाणली नसेल. परंतु हेंहि म्हणणें योग्य नाही. कारण प्रत्यक्ष तीर्थावळींत ज्ञानेश्वरांचा 'प्रत्यक्ष भेटले पांडुरंग' 'परब्रह्म मूर्ति' असा उल्लेख आहे. अशा रीतीने एकाच प्रकरणांत दोन परस्परविरोधी उल्लेख आहेत. असे विसंगत उद्‌गार नामदेवाकडून निघणें शक्य नाही व दुसरें असें की तीर्थावळींतील हे उद्‌गार त्यांचा कच्चेपणा व अपक्वता दाखवीत असले तरी त्यांच्या अभंगांतील त्यांच्याच साक्षीवरून असें दिसून येतें की त्यांनी पक्कावस्थेंत अथवा गुरुकृपेनंतरच अभंगरचनेला आरंभ केला आहे. नामदेव तर काय परंतु साऱ्या वारकरी संतांनी पक्वावस्थेनंतरच अभंगरचना आरंभिली आहे. आणि पूर्णत्वास पोचलेले संत नामदेव असले आत्मप्रौढीचे उद्‌गार काढतील हें अशक्य दिसतें म्हणून ह्या शंका व्यर्थ आहेत.

नामदेवांनी गुरुकृपेनंतरच अभंगरचनेला प्रारंभ केला असें आम्ही कां म्हणतों व त्यावरून तीर्थावळीबद्दल कोणता निष्कर्ष निघतो ह्याची चर्चा पुढील लेखांत करूं.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. गडकऱ्यांचा विनोद	--श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	--कविभूषण ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

ग्रामजोशी घराण्यांतील कागदपत्रें

संशोधक : **शंकर गोविंद चट्टे, एम्. ए., शास्त्री**

(खालील पत्रें येथील ग्रामजोशी घराण्यांतील असून तीं माझे मित्र रा. कृ. जोशी यांच्या कृपेनें मला पहावयास मिळालीं. पत्रें अत्यंत जीर्ण असून कांही भाग नष्ट झाला आहे. तथापि ह्या पत्रांमुळे नागपूरच्या इतिहासावर बराच नवीन प्रकाश पडतो.)

[पत्र क्रमांक १]

प्रस्तुत सनद गोंडपूर्वकालीन गवळी राजांची आहे अशी या घराण्यांत परंपरागत समजूत आहे.



पट्टा सासानपत्र श्री महाराजाधिराज राजश्री पाह्कित (?) ये तुळोवाजी राजे गोसावी त ॥ वीस जोशी व लोड जोशी कसवे नागपूर तुमचे वीसे जाटोबा आदिकारिये विनंती केली जे नागपूर उपक्त जाले जोशी येथ याव्याची वासनी (क) करितेति तरी यासी काही ते वींति देणे त्यावरुन् सहकुटुम्बी येथ येतील म्हणोनु विनंती केली ते परिसिली जे तुम्हासी वींति इनामती सिवार्थी सालियापासुनु दिव्हली असे त॥

विस्वा कसबा घाणे जेते	जमीन मौजे घोकाडे (?)
दुरवडचे गावे	बोरडे सी
दर बगी ८॥ अडीकी	भूमिवेतन ६८६ बिघे

वरिसासन सालीना टके ३०   हल्ली करार कसवा वानखेड देहजदीन.

ही सनद फाटली असून मागील मजकूर अस्पष्ट आहे.

[२]

जाटवाजी श्री माहाराजाधीराज राजश्री जाटवा श्री महिपतोराये देवराजे गोसावीचा मुकुंद जोसी व नाग जोसी...विर्तेस्वर कसवे नागपूर दत्तपट्टा...दिघला ऐसा तुमचे बावे ठाकूर...नेगी हुजुर विनंती केली जे मुकुंद जोसी व नाग जोशी याही दिवाण विति पट्टा करुन दिघला आहे त्यापैकी...वई करुन मदनराये...नवाडें याही मुकासा दिवला यावावत मजकूर हुजूर...जाला पाच मिळोन विनंती केली जे...दिनानीचा सिक्कापट्टा आहे तो करार... ... ...विर्ति पट्टा करार केला आहे तो गांव.........मौजे मानेवाडा कसबा.

[३]



उ माहाराजाधिराज राजेश्री (केसो) बाजी महिपतिराये देवराजे गोसावी मुकुंद जोसी व नरायण जोसी वृत्तेस्वर कसवे नागपूर पटा लिहून दिवला ऐसा जें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुझत्राबे ठाकूर हरहरराये छगलिया हुजूर येऊनु...कदीम जोसी वृत्तेस्वर आहे यासी वृति गाऊ मोकासा देणे म्हणोनु विनंती केली ते परिसीन तुम्हास वृति गाऊ मोकासा मौजे सुकळी म॥ मजकूर गाऊ येक जाटपैकी म॥ दिधला असे व नवा तेलियाचा घाणा येक करुन खाणे.

[४]

महाराजांनी

मझमून हिंदवी॰ तहरीर फिऊल तारीख १० जुलुस ३९ बेशमी नागनाथ जोशी ब्राम्हण व्रीतिस्वर कसबे नागपूर सु॥ ११०२ कारणे लिहून दिधले ऐसाजे मौजे .... व मौजे खरवी मामले मजकूर या गावापैकी सुदामत विरती जमीन बमोजिब सनद तुम्हास आहे ते आबाद करुन खाणे आणि आसिरवादु देत जाणे म॥ ता। १५ माहे रबिलाखर ३६ जुलुस संवत्सर.

[५]



बमुत्सद्दीयान परगणा नागपूर बमुजब मोहर दरगाह आरंद सुजाएतशार सेखमान सेकदार व मुरलीधर कारकून प॥ नागपूर मालुम बुदवेशमी नामे जगन्नाथ जोशी इनाम बंजर खारीज जमा नेतन ६८ सा एक वालपन्हा राजाजी नवसही ठाकूर परसराम ... मौजे हरदुरी दिधली आहे तरी बमोजिब सनद राजाजी तुम्ही याहासी मसरुफात करणे की किर्दी बावती करुन खात जातील म॥ तेरीख ७ माहे जिल्हेज.

[६]

श्री

अस्सल प्रा। नक्कल

छं. माहाराजाधिराजा राजेश्री कोकसाहेजी महिपतिराये देवराजे गोसावी ता॥ मुकुंद जोशी व नागजोशी वरतीस्वर कसबे नागपूर पट्टा लिहून दिल्हे ऐसा तुमचे बाबे ठाकूर सारंगराये सागली याहनी हजूर येऊन मालुम केले जे जोसी जुने पुरातन विरितेस्वर आहेत याहची व्रति बा॥ जाली पाहिजे ऐसी विनंती केली तो परिसोन तुम्हा लवुनी गांव मोकासा मौजे वडधावणा आपले मामले म॥ वा॥ ल सारा मोकासा दिल्हे आहे व कदीम वा॥ जमीन नेतन पाच व कदीमपणा चालू जिमा आहे व कदीमपट्ट्याप्रमाणें खाणें व दिवाणास आसिरवाद देत जाणे पटा मुकुंद याहास देणे मोर्तब सुद तारीख ४ शु॥ श्रावण १६९१

[७]





ई श्री माहाराजाधिराज श्री केसरीसाहेजी महिपति देवराये गुसाई ता॥ पटेल मौजे किरणापूर प्र॥ नागपूर वा॥ ......निरोपु गाव मोकासा नार जोसीको दियो हये इनको दुमाल रहने तो २ वदि ज्येष्ठ संवत १७१७ वर्षे.

[८]

पटे नामा राजेश्री दलपति रायेजी भोईर कर्यामसल ये ते चिंतामण जोसी नागपूरकर संवत १६२७ व पार्थिव नाम संवत्सर कारणे पटेनामा लिहून दिधला ऐसाजे तुम्हास वीति बावर कसबे मजकुरीचे नानाजी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संवसापैकी दिघले असे. हे वावर तुम्ही जोतून खाणं आणि संध्या स्नान करून आसीरवाद देत जाणे हा पटा सही त ॥ ७ वदि ज्येष्ठ.

[९]

सिक्का   श्रीजी

रुजु दुर्गाजी अमीन

फौजदारांनी व सेकदारांनी व कारकून व देस-मुखांनी व देशपांडिये व मोकासदारानी म॥ नागपूर स ॥ ११०८ मा ुम...मौजे मुरझर म॥ ...नब चिंतामण जोसी प्र ॥ याहासी व्रीति दिवला आहे तो मौजा याहाचे हवाला करणे उजूर न करणे ताकीद छ जाणीजे म ॥

छ ९ सफर   ता ९ सफर

[१०]

सिक्का

ई श्री माहाराजाधिराज राजेश्री वशान विलदखान जुं महिपति राये देवराजा गुसाई त ॥ पटेल मौ वेदकुही म ॥ मोह खेडी वाट भंडार आरोगाव मोकासा चिंतामण जोसीको दिया है सो इनके दुमाले रहने दिजे

मोर्तबसुद ता १४ सुध आ साढ संवत १७६६ वर्षे रुजु दप्तर लाला रामचंद्र हुमसा.

सिक्का

[११]

राजश्री बाळाजी त्रिंबक प्र. पेट कर्णापूर पा नागपूर गोसावी. सुभा सन आर्बेन मया अलफ वा मूर्ति राजश्री भीमजोशी वस्ती का नागपूर यांसी जोस-पणाची वृत्ति पेशजी स्वस्थानिकापासोन सेहरपेठा वगैरे प्रा म॥ रुची वहिवाट चालितच आहे सांप्रत ब्राम्हण क्षत्रिय वेश्य शुद्र वगैरे जोसपणाच्या ज्या ज्या बावती आहेत त्या त्या बावती सर्वत्र घेऊनच आहेत परंतु पेशजी सिरस्ते कोण्ही कोण्ही देतात कोण्ही देऊनच नाहीत याजकरिता त्या लोकास ताकीद करुण देऊन दरोवस्त ज्या ज्या बावती पूर्वीपासोन चालीत ज्या ज्या सालिमेस आले अस्तील तेण्हेप्रमाणे त्याहा लोका-पासून जोसी म॥ रास देऊन देवीत जाणे जाणिजे छ १६ माहे सफर वहुत काय लिहिणे मोर्तब सुद.

[१२]

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री वर्तमान भावी जीमा पेट कर्णादपूर पा नागपूर गा यासी उ अखंडित लक्ष्मी आलंकृत रा (जमान्य) स्ने॥ रघोजी भोसले सेनासाहेब सुभा सब आर्बेन मया व अलफ ••• राजश्री लुड जोसी नागपूर यांचे पुत्र हीर जोसी व नार जोसी यांची जोसपणाची वृत्ति पेशजी पासून शहर पेठा वगैरे पा म॥ रची वहिवाट ••• पावेतो चालीत आहे ब्राम्हण क्ष(त्रि)ये वईश शुद्र वगैरे जोसपणाच्या ज्या ज्या बावती आहेत त्या सर्वत्र देऊनच आहेत परंतु पेशजी सिरस्ते बमोजिब कोण्ही देतात व कोण्ही देऊन नाहीत याजकरितां त्या लोकाहीस ताकीद करुन देऊन दरोवस्त त्याहा लोका-पासून जोशी म॥ देऊन देववीत जाणें. या सनदेची न(कल) (करुन) असल सनद भोगवटीया(स) जोशी म॥ दरकन देणे जाणिजें माहे रजब बहुत काय लिहिणे मोर्तबसुद.

शाहुराजपदांभोज
भ्रमरायित चेतस:
विंबात्मजस्य मुद्रेयं
राघवस्य विराजते

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्रव्यवहार

श्री. संपादक 'युगवाणी' यांस

सा. न. वि. वि.

श्री. द. चि. सोमण यांच्या कवितासंग्रहाच्या निमित्तानें लिहिलेलें श्री. पु. भा. भावे यांचें पत्र मागील अंकांत वाचलें. श्री. सोमण यांचे संग्रह मी वाचलेले नाहीत. परंतु स्फुट कविता वाचल्या आहेत. श्री भावे म्हणतात, त्याप्रमाणें संग्रहामध्ये पहिल्या प्रतीचें काव्य आढळेल अशी मी अपेक्षा करतों. संग्रह वाचण्याची संधि मला आजवर मिळाली नाही याबद्दल मला खेद वाटतो.

परंतु, श्री. भावे यांच्यासारख्या उत्कट भावनेच्या कलावंताने या निमित्ताने असें पत्र लिहावें हें 'फार शोचनीय' आहे. वाङ्मयांत काय किंवा कोठल्याहि क्षेत्रांत काय आंघळी गटबाजी, पक्षांधता व अप्रामाणिकपणा नसावा, रास्त टीका असावी, मतभेद असावेत पण "मठ्ठपणा" नसावा, हें त्यांचें मत मला मान्यच आहे. पण त्याहून महत्त्वाचें असें की अधर्मयुद्धहि नसावें. पण नेमका हाच दोष श्री. भावे यांच्या पत्रांतून उघडेवोडकेपणाने दिसत आहे.

श्री. भावे यांनी माझ्यावर हल्ला चढविला आहे तो धर्मयुद्धाच्या पद्धतीने नव्हे. श्री. सोमणांच्या काव्याचें निमित्त करूनच उगीच विषयांतर करून केलेल्या या प्रहारांत श्री. भावे यांचा मुख्य रोख असा आहे की श्री. लालजी पेंडसे व श्री. डांगे यांच्या साहित्यविषयक मतांशीं मी सहमत आहे. हें साफ खोटें आहे. ही गोष्ट श्री. भावे यांना माहित नाही कां ? कां माहित असून ते वेड पांघरीत आहेत ? माझ्याविषयीं लिहितांना ही माहिती नसणें हा निष्काळजीपणा आहे व माहिती असून लिहिलें असेल तर तें अश्लाघ्य ठरेल. वस्तुतः, यांत निष्काळजीपणाच असावा, म्हणून थोडा खुलासा करतों. श्री. लालजी पेंडसे यांचें "साहित्य व समाज-जीवन" हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावरोबर लगेच त्यांतील भूमिकेविषयीं माझी व श्री. पु. य. देशपांडे यांची चर्चा झाली व त्या भूमिकेशीं मी तेव्हापासूनच, म्हणजे गेलीं वीस वर्षें, सहमत नाही याचा निर्वाळा श्री. देशपांडे देऊं शकतील. त्यांनी श्री पेंडसे यांच्यावर टीका लिहिली व त्या टीकेचा व श्री. पेंडसे यांच्या भूमिकेचा परामर्श घेणारा एक लेख मुंबईच्या "प्रतिभा" पाक्षिकाच्या नोव्हेंबर १, १९३६ च्या अंकांत मीं लिहिला. त्यांत श्री. पेंडसे यांची भूमिका कशी उथळ, यांत्रिक व त्याज्य आहे तें मीं दाखवून दिलें. "साहित्य निर्मिति व समीक्षा" या माझ्या परवांच्या संग्रहांतहि श्री. पेंडसे यांच्या भूमिकेशीं माझा स्पष्ट विरोध असल्याचें मीं पान २८ व ४२ वर मांडलें आहे. श्री. डांगे यांच्या भूमिकेची तीच गोष्ट आहे. कालिदासाच्या कलेचें मर्म व वर्म आपल्याला गवसलें आहे अशा कल्पनेने त्यांनी कांही लिखाण केलें आहे, त्यांत "सरंजामदारी" व कालिदासाची कला यांचा संबंध दाखविण्यापलिकडें कांही नाही. सामाजिक अन्वय म्हणजेच कलासमीक्षा असें त्यांचें सुलभ त्रैराशिक (किंवा द्विराशिक) आहे. सारांश, श्री. डांगे यांची भूमिका श्री. पेंडसे यांच्याप्रमाणेच आहे व ती मला नेहमी उथळ व यांत्रिक वाटत आली आहे. ही माहिती श्री. भावे यांना कदाचित् उपयोगी ठरेल अशा अपेक्षेने देऊन दुसऱ्या मुद्याकडे वळतों.

श्री भावे म्हणतात की मुक्तिबोध व अमरशेख यांना मी एका "पंक्तीं"त बसविलें आहे. मग यांत बाटवाबाटवी झाली असा एवढा आक्रोश करण्यासारखें काय आहे ? वाङ्मयीन व इतरांहि क्षेत्रांत 'संप्रदाय' व 'प्रवृत्ति' मानाव्या लागतात व त्यांत लहानथोर समानशीलांना एकत्र धरावें लागतें. मराठी नवकवितेंत सामाजिक क्रांतीच्या प्रेरणेने भारलेले कवी व विफलतेनें ग्रासलेले कवी अशा दोन प्रवृत्ती मानणें मला योग्य वाटलें व तशी विभागणी मीं केली. ती तुम्हीं चूक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणा; पण यांत 'साळसूद सोंग' कसें दिसतें ? केवळ प्रत्युत्तरच करावयाचें तर मला म्हणतां येईल की, पंक्तिपावनतेची श्री. भाव्यांची वृत्तीच सोंगाडी आहे; वाङ्मयीन निःस्पृहतेच्या व पक्षनिरपेक्षतेच्या बुरख्यामागें दडलेलें राजकीय व सामाजिक द्वेषांचें गरळच त्यांच्यां या वृत्तीच्या बुडाशीं आहे व आपलें वाङ्मयबाह्य द्वेष लपविण्यासाठीं हें वाङ्मयीन निस्पृहतेचें व शुद्धतेचें सोंग आहे. पण ही चिखलफेक तुम्ही आम्ही करण्यांत एकंदर मराठी साहित्याचा बोज व दर्जा खालावत नाही काय ?

प्रवृत्तीच्या प्रश्नाहून प्रतीचा प्रश्न वेगळा आहे. ही साधी गोष्ट मला कळत नाही असा श्री. भावे यांचा लाडका समज दिसतो. तो त्यांच्या दृष्टीनें सोईस्कर आहे पण खोटा आहे. "साहित्य निर्मिति व समीक्षा" या पुस्तकांत पानें ४२, १०७ व १२१ या ठिकाणीं मीं माझी यासंबंधींची भूमिका स्पष्ट केली आहे ती पहावी व आपला समज काढून टाकावा अशी मी श्री. भावे यांना विनंती करतों. किपलिंग, डी. एच. लारेन्स किंवा आपल्याकडे मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ प्रभृतींना मी कलावंत म्हणून श्रेष्ठ समजतो आणि उथळ व सवंग आशावादी लेखकांना खालच्या दर्जाचें मानतों. मला हें साधें तारतम्य आहे ही गोष्ट श्री. भावे यांना दिसत नाही याचें कारण त्यांची दृष्टीच राजकीय द्वेषानें सत्यांध झालेली असावी ! जो "साधा प्रामाणिकपणा" त्यांना साहित्यप्रांतांत दुर्मिळ झालेला दिसत आहे तो अशाच सत्यांध वृत्तीमुळे नाहींसा होत आहे. असो.

माझ्या साहित्यविषयक मतांमध्यें 'उथळपणा व आंधळेपणा' असून तो केवळ "गटबाजी" व "पक्षांधता" यामुळे झाकला जात आहे व फसलेले भाबडे लोक मला "शहाजोग" पणाचें (या ठिकाणीं श्री. भावे यांनी "समंजस" या अर्थी चुकून "शहाजोग" हा शब्द वापरला आहे) शिफारसपत्र अनाठायीं देत आहेत असा श्री. भावे यांचा अभिप्राय आहे. श्री. भावे यांचें हें निदान खरें कीं खोटें हें काळच ठरवील. परंतु, समजा, त्यांचें हें म्हणणें खरें असलें तरी त्यांनी तें मांडतांना "साळसूद सोंगाचा" आरोप माझ्यावर लादण्याची काय गरज होती तें मला कळत नाही. मतभेद व्यक्त करतांना असे दुष्ट हेतूचे आरोप करण्यानें काय साधतें ? आणि एका कवीचा कैवार घेण्याचें निमित्त करून अशा विषयांतरित वाकडेपणांत शिरणें ही कोठली रीत ? माझी श्री. भावे यांना विनंती आहे की त्यांनी थोड्या थंडपणानें माझ्या भूमिकेविषयीं विचार करावा व हवी तेवढी कठोर परंतु सरळ टीका करावी. ढोंगीपणाचे बेफाट आरोप करण्यांत मोठा निस्पृहपणा व शौर्य आहे हा पौगंडावस्थेंत शोभणारा समज टाकून देऊन मराठी टीकाक्षेत्रांत असलेला "आंधळेपणा" व "गटबाजी" दूर करण्यासाठी स्वतः आंधळेपणाच्या दोषापासून त्यांनी अलिप्त रहावें अशी माझी त्यांना विनंती आहे.

१२५९/२ जंगली महाराज रस्ता
पुणें ४
ता. ८-४-५५

आपला
दि. के. बेडेकर

परीक्षा समिति, वि. सा. संघ

श्री. तु. ब. बोडखे साहित्य पारंगत, राष्ट्रभाषारत्न, यांची परीक्षा समितीचे कार्यालय मंत्री म्हणून अंशकालीन अल्पकालीन वैतनिक नियुक्ति करण्यांत आली आहे.

पां. कृ. सावळापूरकर
संचालक, परीक्षा समिति, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

अखेरी साधली

[लेखिका : सौ. उमा फडणीस, पृ. ६७, किं १ रु. प्रकाशिका : सौ. द्वारकाबाई शिरास]

पन्नाशी उलटल्यावर आटोपशीर संसाराच्या गृहिणीला जो मुबलक सवडीचा वेळ मिळतो त्याचा उपयोग लेखनकार्यासाठी करण्याचा प्रस्तुत लेखिकेने निश्चय केला. पद्धतशीर शिक्षणाचा लाभ लहानपणींहि मिळाला नसल्यामुळे या कार्यांत थोडेसेंहि यश मिळणें कठीणच होतें. पण बरीच वर्षे चिकाटीने व केवळ स्वतःच्या समाधानासाठी प्रयत्न करीत राहिल्यावर या दीर्घकथेंत तिनें बरेंच यश संपादन केलें आहे. कथेच्या तंत्राचा विचार करूं लागलें तर वर निर्देशिलेल्या परिस्थितीचीच आठवण ठेवणें प्राप्त आहे. व्यक्तिदर्शन, कथानकाची घडण, भाषेचें सौष्ठव, इत्यादि कोणत्याहि बाबतींत ही कथा नजरेंत भरणार नाही. परंतु एक गोष्ट मात्र तींत निश्चित आहे आणि ती म्हणजे आजच्या नव्या संसारांत उद्भवणाऱ्या कांही समस्या, आजच्या मुली किंवा आजचे महत्त्वाकांक्षी सुखविलासी तरुण यांच्या परस्परांविषयींच्या वृत्ति यांची जाणीव. वस्तुस्थितींच्या या जाणिवेला उमाबाईंनी विचारी ध्येयवादाचीहि जोड देण्याचा थोडा प्रयत्न केला आहे. त्यांनी सूचित केलेला मार्ग कोणाला अव्यवहार्य किंवा अवास्तव वाटला तरी त्यांच्या नायिकेचा विचारीपणा आकर्षकच वाटेल.

पुत्रशोकापासून विरंगुळा मिळावा, सांसारिक जीवनाच्या उतरणीवर कांही चांगल्या उद्योगांत काळ घालवण्याचें समाधान लाभावें, यासाठी लेखिकेने आरंभिलेल्या प्रयत्नांचें कोणीहि कौतुकच करील.

—कु. वे.

पं. जिनदास पार्श्वनाथ फडकुले

(जीवन आणि साहित्य)

(प्रकाशक श्री हिरालाल छगनलाल ४१२, पूर्व मंगळवार, सोलापूर)

पं. जिनदास हे दक्षिण महाराष्ट्रामधील जैन-पंथीय धर्मपंडित असून त्यांचा जैन धर्माचा व्यासंग गाढ, साहित्याचा अभ्यास सखोल आणि समाजसेवेची तममळ फार त्यामुळे लोकप्रियतेचें ते मोठे मानकरी आहेत. त्यांची षष्टयब्दिपूर्ति नुकतीच झाली. त्या निमित्ताने ही लहानशी पुस्तिका श्री. सुभाषचंद्र अक्कोळे यांनी लिहून त्यांच्या सत्कारसमितीनें प्रसिद्ध केली आहे.

सोलापूरकडे जैन धर्मपंथाला आणि समाजाला जें नीट स्वरूप लाभत चाललें आहे त्याला पं. जिनदासांचे परिश्रम पुष्कळ प्रमाणांत कारणीभूत झाले. तेव्हा स्वाभाविकपणेच त्या वर्गाला त्यांच्याबद्दल कृतज्ञता वाटते आहे कांहीजण त्यांच्याबद्दल भक्ति बाळगून आहेत. अशा कृतज्ञभक्तांचे फळ म्हणून ही पुस्तिका लिहिली गेली आहे. महाराष्ट्रभर जे जैन पंथीय पसरलेले आहेत किंवा अशा पंथोपपंथांचा ज्यांचा अभ्यास आहे त्यांना त्या लहानशा पुस्तकाचें पुष्कळच मोल वाटेल.

—कृ. मा. घ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर परीक्षाफळ, जानेवारी १९५५

साहित्यपारंगत

(एम्. ए. समकक्ष)

गुणानुक्रमें

१ कु. पद्मा वेटावदकर–भंडारा २
डॉ. वा. ग. शिंगणापूरकर सुवर्णपदक
२ विठ्ठल खोंगल–साऊर ३
३ तुलसीराम बोडखे–नागपूर ३
४ सुधाकर चमणकर–वेंगुर्ले ३
५ बाळकृष्ण पाध्ये–नागपूर ३

साहित्यस्नातक

(बी. ए. समकक्ष)

गुणानुक्रमें

१ नत्थू निमजे–चांदा २
२ दामोदर बोरोले–अमरावती २
३ कु. तारा भगत–वर्धा २
४ शरद घाटोळ–अमरावती २
५ ज्ञानदेव बोंडे–अमरावती २

नांव	श्रेणी
म. शि. शहाडे	३
सिस्टर जेनेविन	३
दा. पां. बोरोले	२
श. पां. घाटोळ	२
ज्ञा. ह. बोंडे	२
कु. तारा भगत	२
कु. नलिनी भगत	३
न. रा. निमजे	२
वि. का. पाटील	२
रा. ओं. मेहरे	३
ज. घु. नाईकवाडे	३
भा. न. डुंभरे	३
रा. म. दाभाडे	३
कु. कुसुम पंडित	३
,, नलिनी खंडागळे	३
,, मालती अभ्यंकर	२
कु. बकुळा परमानंद	३
रा. कृ. हरकरे	२
ग. रा. फटिंग	३
रजनी साठे	३
श्रीमती शांताबाई जोशी	२
सौ. मनोरमा भुसारी	३
रा. तु. पाटील	३
ल. द. दाऊतखानी	३
व. ना. कावडकर	३

साहित्यपरिचित

गुणानुक्रमें

१ कु. उषा कामडी–नागपूर २
२ शं. म. तराळे–हिंगणघाट २
३ कु. सरल देशपांडे–नागपूर २
४ सौ. कालिन्दी बोकारे –हिंगणघाट २
५ ,, उषा खांडेकर–कामठी २

नांव	श्रेणी
कु. तारा एलकुंचेवार	२
न. ल. साखरकर	३
पां. तु. कावळे	३
चं. द. कोल्हे	२
मा. ना. नारखेडे	३
कु. सुशिला देवघरे	३
म. दा. सज्जनवार	३
ना. दे. गिरडे	३
गु. वा. भुते	२
मा. बा. भुते	३
ना. कि. नागेकार	३
व. मा. आचार्य	३
वि. फ. सरागे	३
कुं. वि. काटेकर	३
व. कि. गोरे	३
ब. ग. इंगळे	३
श्री. वं. मानवणे	३
नि. तो. नारखेडे	३
व. पं. टेंभुर्णे	२
ना. का. काहारे	३
म. द. माजगांवकर	३
म. वा. हिरडे	३
वि. कें. परळीकर	३
कु. प्रमिला अतकर	२
क. दे. अवस्थी	२
रा. ल. लाडेकर	३
शं. म. तराळे	२
सौ. कालिन्दी बोकारे	२
व. आ. बक्षी	३
श. ओं. कोलते	३
द. ब. मुद्गल	३
म. गो. कामथे	३
चं. स. सातपुते	३
वा. न. लाखे	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
म. ह. साठे	३
आ. म. कोल्हे	३
ल. के. सोनटक्के	३
कु. मालती वोधनकर	३
,, उषा कामडी	२
,, विद्यादेवी पटाईत	२
,, सुमति घुले	३
,, पद्मावती गोखले	३
,, शकुन्तला पंचवटीकर	३
,, प्रमिला अलोणी	३
,, सुधा कपले	३
,, मंदाकिनी काळीकर	३
,, सरल देशपांडे	२
ब. गं. कवरे	३
मु. पां. सावळापुरकर	३
द. मो. वाघमारे	३
द. प्र. जोशी	३
कु. सुनन्दा सोहनी	३
,, उषा दामले	३
ग. दे. घोतरकर	३
ह. दी. काळे	३
श. गो. पार्डीकर	३
लो. घा. बिरीत	२
कु शकुन्तला देशपांडे	३
सौ. उषा खांडेकर	२

साहित्यविनीत

गुणानुक्रमे

१ श्रीधर मालठाणकर-हिंगणघाट १
डॉ. दिवाणजी पारि. प्राविण्य
२ शशिकांत ठोंबरे–मोर्शी १
३ सखाराम लोखंडे–चिखली १
४ कु. मालती कोलते–अमरावती १
५ ,, मंदाकिनी वोरवणकर ,, १

नाव	श्रेणी
कु उषा नाजपांडे	३
,, प्रमोदिनी प्रधान	२
कु. शालिनी वडगे	२
,, शशिकला मुंबडा	३
,, सिंधू देशपांडे	१
ज. ना. कुहीकर	३
द. गो. पोफळी	२
द. दि. पिंपळापुरे	३
भ. न. हजारे	३
कु. कुमदिनी पिंप्रीकर	२
,, शालिनी आवदे	३
गो. ओं तायडे	२
ता. मु. झिरमिरे	३
मो. पु. डांगरा	३
स. क. राठी	३
द. रा. सरोदे	३
ज़ा. रा. खुमकर	३
दि. ना. देशमुख	३
पु. म. जावरकर	३
दि. शं. पाटील	२
के. शं. पाटील	२
वि. वि. जोशी	३
श. ह. ठोंबरे	१
पु. मा. पुसलेकर	३
भी. ना. सावरकर	३
रा. सी. पाटील	३
प्र. ना. देशमुख	३
कु. लीला जोशी	२
दी. म. ठाकरे	२
वि. शे. गावंडे	३
रा. र. खोडस्कर	३
जा. रा. ताथोडे	३
म. सू. सातपुते	३
वि. सी. गायकवाड	३
या. ग. खैरकर	३
मा. गं. संगेकर	३
अ. म. गिरी	३
गो. ल. काळे	३
वा. ह. मंचनवार	३
म. क. मिश्रा	२
य. द्वा. चिटणीस	२
रा. वि. विश्वरूपे	३
वि. व. केळापुरे	३
कु. सुशिला कस्तुरे	३
र. त्रि. टिपणीस	३
न. भा. नागपुरे	३
व. ग. चन्ने	३
म. श्रा. कापसे	३
घ. कि. लिलहारे	३
ति. शि. बावनेकर	३
व. सी. यादव	३
मा. रा. शिवणकर	३
ह. स. राऊत	३
घ. स. नंदागवली	३
अ. गफ्फार अ. कादिर	३
न. आ. नाखी	३
उ. आ. तिखोले	२
वा. अ. भुस्काडे	३
भी. म. गहूकर	३
सौ. वसुधा सूर्यकर	३
रा. मा. खापरे	३
श्री. कृ. वोंडे	३
रा. ना. निस्ताने	३
दे. व. खेडकर	३
वि. रा. घोटे	३
रा. पै. ठाकरे	३
वि. भि. मिसार	३
म. अं. लांजेवार	३
रा. अ. डोंगरवार	३
ह. ना. खेडीकर	३
ना. सु. राऊत	३
श्रा. ग. खोंडे	२
उ. ह. ठाकरे	२
ग. बा. बावणे	३
गो. रा. तंगडपल्लीवार	३
सु. उ. गादेवार	३
भा. व. पिलारे	२
य. रा. भुते	२
र. सो पडोळे	३
दि. द. जोशी	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
कि. म. भैय्या	३
शां. न. भोयर	३
अ. वि. माकोडे	२
न. पां. कांवळे	३
ग. रा. गजपुरे	३
कु. प्रमिला तांदळे	२
र. श्रा. उंदिखाडे	३
जी. बा. राजपूत	३
मां. ला. परळकर	३
श्री. ह. बोराळे	२
व. ह. सदावर्ते	३
घ. म. राजपूत	३
मा. रा. शेळोकार	३
कु. प्रभावती राणे	३
,, चित्ररेखा मेतकर	३
,, सुशीला वराडे	२
,, सुमन देशपांडे	३
,, सिंधू घरणगांवकर	३
,, प्रमिला सोमण	३
,, नलिनी नाफडे	३
शं. पुं. कोलते	२
विं. वि. खन्ना	३
भा. कि. झांवरे	३
प्र. स. जोशी	३
रा. सो. डवले	३
दि. शं. राणे	२
कु. सुमन मिर्जापुरे	२
,, मालती भोगे	३
गु. बा. वेलूकर	३
रा. म. पांगारकर	२
पद्मावती बंदे	२
प्र. रा. लाडे	२
पु. आ. देशमुख	३
वा. वा. संत्रे	२
कु. आशालता पिंपळे	३
सौ. इंदिरा पोतदार	२
कु. कमल पिलपिले	२
,, पुष्पा तारे	१
कु. प्रमिला उपाध्ये	२
,, मन्दा साखरे	२
,, मालती पांडे	२
,, विमल कुचे	२
शकुंतला बनारसे	२
कु. शशिकला मांडवगणे	१
,, सुमति आंबेकर	१
,, आशा बापट	२
,, इंदु कडू	२
,, उषा बन्नोरे	१
,, कमल सरनाईक	१
,, कमल बोके	२
,, कमल मोडक	२
,, कमल वाघे	१
,, कुन्दा थोंगे	२
नलिनी पारसकर	२
,, नलिनी देशमुख	२
,, नलिनी रा. देशमुख	२
,, पुष्पा पोहेकर	२
,, प्रभावती मिरकुटे	३
,, मालती कोलते	१
,, मालिनी कोल्हेकर	१
,, मंगला सावरकर	१
,, मंदाकिनी बोरवणकर	१
,, लीलावती गद्रे	१
,, विजया जोशी	२
,, विमल घोटे	१
,, विमल वसु	२
,, विमल पांडे	१
,, वेणू इंगळे	१
,, सुधा यादव	१
,, सुमति गोखले	२
,, सुमन दुद्दलवार	२
,, सुशिला देहनकर	२
,, संजीवनी मुखरे	२
,, सिंधू सोलव	२
,, शकुंतला केतकर	३
छ. सु. पांढरे	३
ना. तो. बोडखे	३
पु. भा. बोके	३
प्र. गो. व्यवहारे	२
वा. वा. अस्सोड	३
म. रा. पाटील	३
मा. द. फडके	३
रा. ना बोबडे	३
रं. य. भेरडे	३
ल. तु. देशमुख	३
वि. दो. इंगोले	३
सु. अ. रानडे	३
अ. न. मालोदे	२
अ. कृ. देशमुख	३
के. ल. विवळे	३
गु. कि. पोपळघाटे	३
चि. पु वाजपे	३
चं. दा साळवे	३
ज. व. शहारे	३
पु. शे. थोंडे	३
पुं. वि. असलमोल	३
प्र. सु. नितनवरे	३
वा. पु. सखरे	३
भ. ल. सवाई	३
म. गो. देशमुख	३
रा. सं. इंगोले	३
रा. शं. चव्हाण	३
ल. बा. मेश्राम	३
वा. ह. हिवराळे	३
वि. गं. वाजपे	२
स. सं. मालवये	२
आ. आ. व्हायकर	३
तां. सु. बोम्बर्डे	३
उ. म. माकोडे	३
उ. के. देशमुख	३
दे. कृ. मोरे	३
रा. ना. गोळे	२
वि. ना. हेन्डे	३
वि. गु. गोंडचवर	२
कु. शकुंतला आवंडकार	३
शि. रा. तपहा	३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
कु. सुशिला देऊळकर	२
,, सुमन संगई	३
सु. र. जोहरापूरकर	२
सु. वि. पवार	२
रा. रा. कोल्हे	३
जा. बा. हरले	३
शं. ज. चकनलवार	२
रा. मा. रोजटकार	३
व. वि. ओचावार	२
भ. शं. कांवळे	३
बा. श्रा. साठवणे	३
के. गो. तेलंग	१
पां. डो. सोरते	३
गो. शं. यावले	३
श्री. वि. खोंदले	३
गु. दौ. चौधरी	३
भ. मा. जवंजाळ	२
वि. के. देशमुख	३
दा. गो. बोवडे	२
प्रे. म. चव्हाण	३
वि. को. सुकळकर	३
रा. वा. घानोरकर	३
का. आ. आगाशे	३
कु. कमल पंत	३
ग. ल. खानझोडे	२
कु. प्रमिला माहूरकर	३
म. वि. गोसावी	३
म. बा. पांढरकर	२
व. का. अंजनकर	३
प. श्री. खोडके	२
ग. म. म्हसकी	२
शि. दे. उगले	३
रा. हा. वनसोड	३
वि. वा. हाडोळे	२
च. के. कोतेकर	२
श्री. वि. महाजन	२
चं. का. कोटेचा	३
क. का. तिवई	२
म. भी. गंधवे	३
कु. कॅथराईन पिल्ले	२
कु. ज. पवार	३
रा. बु. डोंगरे	३
म. ना. कमाविसदार	३
कु. सुशील शेंडे	३
कु. उषा काशीकर	२
सा. गो. फलके	१
दि. उ. मेंढे	२
ने. झि. डाहाके	२
कु. अनसूया कोकाटे	२
ज. भा. उल्हे	३
कु. कमल कुंभारे	२
भा. ग. काकपुरे	३
कु. कुसुम बेले	३
कु. सिंधू उज्जैनकर	३
कु. चंद्रकला वानखेडे	३
शा. ना. मुन्दडा	३
दि. ग. तायडे	३
प्र. मा. गायकवाड	३
प्र. तु. उन्हाळ	३
ता. हृ. भट्टड	३
रा. झुं. लाहोटी	३
अ. पु. राजे	२
हि. ला. लट्टरिया	२
मा. प. लाहोटी	३
म. ना. कुळकर्णी	१
व. मु. लाहने	२
का. मो. अंबुसकर	२
म. भा. मानकर	२
कु. सुनंदा तारे	३
वि. वा. देशपांडे	३
वि. वा. खेडेकर	३
कु. नलिनी शुक्ल	३
ज. गो. गोरघाटे	३
सौ. विमल गोंधळेकर	२
रा. सु. काटेखाय	३
श्री. वि. मावळे	२
स. ग. पिपळकर	२
ग. पे. माडूरवार	३
व. ना. वडनेरकर	२
ग. ह. नैताम	२
न. तु. भेंडारे	३
पु. रा. जांगडे	३
श्रा. जा. घुवडे	२
ग. शं. रासेकार	२
वा. रा. डुंबरे	२
शा. धों. जीवतोडे	२
म. ज. कोटकर	३
ग. मा. गुंडमवार	२
वा. कों. सोनुने	३
जा. सि. ढोक	३
ह. रा. रामटेके	२
वा. उ. कहुकर	३
श्री. गो. मांडवकर	२
वा. घ. मेंढे	३
दे. शि. दौलतराव	२
भ. अ. ताजने	३
भो. वि. ढेंगळे	३
पु. चं. राठी	३
रा. पां. राठोड	३
शं. रा. बोवडे	३
शं. भि. तायडे	३
ल. वि. ढवळे	२
वा. का. केने	२
ह. म. सुरमवार	३
रा. दौ. राऊत	२
शं. गो. खणगन	२
श्री. वि. पांडे	३
त्रि. तु. सोमनाथे	२
मा. मो. पांचघरे	३
दौ. सी. पाटील	३
के. मा. महाले	२
द. शं. वावनकर	२
कु. इंदुताई ओळंबे	२
कु. इंदु फडणवीस	३
कु. द्वारका दिवेकर	२
कु. उषा महाजन	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
ज्ञा. चं. काकडे	३
भ. शं. जोशी	२
न. स. भवर	२
गु. ह. राजपूत	३
द. ग. जट्टे	२
के. वा. सरकटे	२
दि. गं. विनिवाले	२
पु. व. मोरे	२
सु. पुं. भगत	३
नं. घ. खंडेलवाल	३
ना. ग. खरात	२
स. शं. लोखंडे	१
म. ह. महाजन	३
रा. भे. व्यास	३
ल. गो. पडघाण	२
कु. शांता तान्दळे	३
तु. शा. कुळकर्णी	२
कु. त्रिशला महाजन	३
कु. लीलावती भिसीकर	३
कु. इन्दुमती भिसीकर	३
कु. कुसुम जोशी	३
कु. उषा मुलमुले	३
कु. कमल वारकरी	३
कु. लीला कुळकर्णी	३
कु. नलिनी मुलमुले	३
वि. रा. गुल्हाने	२
म. घु. इंगोले	३
गो. मु. परळीकर	३
स. ना. भड	२
शं. अ. रुमाले	३
का. शि. कुटे	३
रा. न. नगरनाईक	३
व. रा. बोवडे	३
व. क. वैद्य	२
सु. र. मेहता	२
प्र. चां. गरीबे	२
मु. ग. वळसे	३
सु. के. राजणे	२
गो. ना. ठाकरे	३
वा. म. राजगुरे	२
कु. कुसुम सिंगरु	३
कु. नलिनी घटवाई	३
कु. शकुंतला शेंडे	३
कु. सुमन दाणी	२
ख. ह. वाणे	३
गो. कृ. गाले	३
चं. के. ठकरे	३
दि. के. ढोले	३
ना. ना. भांडे	३
ना. भा. दाभडकर	३
प्र. शे. राणे	२
प्र. दा. पुसदकर	३
भा. ज. लिहीतकर	३
म. गो. गावंडे	३
म. तु. हनोटे	३
म. नी. कीर्तने	३
मं. ब. रामटेके	३
व. वा. देशकर	३
व. रा. सालपेकर	३
वि. मा. देवगिरकर	३
शा. कृ. इसनकर	३
शा. तु. शेंडे	२
श्री. ग. धारकर	३
श्री. द. मालठाणकर	१
सु. अ. सरोदे	२
जा. रा. राऊत	३
वा. चं. ठाकरे	२
वी. मो. भालेराव	३
मा. तु. तडसेकर	३
टि. बु. सयाम	३
ह. ग. इंगळे	३
श्री. रा. सरसे	३
न्या. प. धरमसोत	३
म. के. शहारे	२
ना. वा. पोटभरे	२
वा. अ. पाटील	३
र. सी. करंडे	३
अ. म. कायपूरकर	३
ई. दा. पाटील	३
का. ना. सोनकुसले	२
द. शं. मराडे	३
ना. रा. क्षीरसागर	३
प्र. न. जोशी	३
पुं. व. भगत	२
व. ल. त्यांडी	३
म. सं. सायने	३
मु. प्र. अंधारे	२
ल. दौ. पारवी	३
ल. य. मंगरूळकर	३
वि. पि. माहेकारकर	३
वि. ल. त्याडी	३
सू. श्री. बाहेकर	२
सु. चि. शिंगडिलवार	३
श्रा. सी. नाकाडे	३
कु. मनोरमा पंडित	३
कु. सुमन पाठक	३
कु. नलिनी फणसळकर	३
सौ. मंदाकिनी काळे	३
सौ. लीलावती काळे	३
कु. कुमुद सुरजनार	२
कु. चंपा मानेकर	३
भा. रा कोतवालीवाले	३
ना. रा. पाठक	२
वा. रा. पाठक	१
वि. म. शेरेकर.	२
चं. दि. देशपांडे	३
के. ई. गोपतवार	३
के. ता. मेश्राम	१
शि. अं. वानखेडे	३
गो. द. लंघे	२
नी. शा. काकडे	३
शां. गं. दळवे	३
शा. गो. लघवे	२
कु. प्रमिला कुळकर्णी	२
रजनी देशपांडे	२
,, विमल गावंडे	३

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
ना. खु. वोरकर	३
नी. ज. मांदाडे	३
शाबासखां पठाण	३
क. रा. बुगदाने	३
म. पां. वोरेकर	२
प्र. श्री जोशी	२
दि. न. कोठे	३
रा. गो. झाडोकार	३
ल. ज्ञा. खुमकर	३
ज. ह. राठी	२
मु. सु. अहीर	२
भी. बं. भालचक्र	२
दा. श्रा. भुतमांगे	३
हि. ब. कानोलकर	३
शं. व. ठाकरे	२
श. मो. तसरे	३
वि. ना. चमणकर	३
प्र. मा. राऊत	३
कु. प्रमिला उपासनी	३
र. मां रंगारी	३
सौ. लीलावती चांदूरकर	२
म. सू. मेंगजे	२
म. ल. कुळकर्णी	२

मराठी प्रारंभ

गुणानुक्रमे

१	नारायण निलाटकर–रामटेक	१
	कु. सुधा राठी–नेरपिंगळाई	१
	पुंडलिक साळोक–चिखली	१
२	नारायण पुप्पलवार–पांढरकवडा	१
३	कु. शशिकला अयाचित–अमरावती	१
	सुरेश पेशकार–रामटेक	१
४	कु. पंचफुला सावरकर–साऊर	१
५	कु. प्रभावती सहस्त्रबुद्धे–पांढरकवडा	१

नांव	श्रेणी
वे. शि. त्रिवेदी	२
ल. रा. दरबे	३
ना. रा. पाण्डेय	२
नं. रु. चौरासिया	२
रा. ल. मिश्र	३
कु. प्रभा मुंजे	३
,, मालिनी गायकी	२
,, लीला पौनीकर	३
उ. ग. गिरडकार	३
उ. कृ. भिवापूरकर	३
क. कृ. नाजपांडे	३
ग. वा. गिरडकार	३
ग. गं. वन्हाडकर	२
ज. प्र. परमार	३
दे. मा. माळवे	२
वि. ल. पौनीकर	३
नं. मा. महेश्वरी	२
पु. श्रा. रिसालदार	३
पां. कृ. कुतरमारे	२
भ. शे. उपगडे	२
म. ग. माडेवार	२
म. दा. भिवापूरकर	२
मा. वि. उंटवाले	२
श. अ. कन्होजे	३
शा. या. तिवाडे	३
सु. डो. उरकुडे	२
सु. रा. नाकाडे	२
ह. ग. आंभोरे	२
उ. तु. शेवने	३
रा. दौ. गाडोदिया	२
ल. अ. चव्हाण	३
खे. नं. शर्मा	३
व. कृ. देशमुख	३
कु. प्रभावती सहस्त्रबुद्धे	१
कु. पुष्पमाला भास्करवार	२
,, मालती केळापुरे	२
कु. विदुला देशपांडे	३
,, सिंधू नार्लावार	२
,, सुमन उपलंचीवार	३
,, सुमन नाहाते	३
अ. कृ. पिपरकर	२
अ. ना. कशाळकर	२
अ. जा. कुळकर्णी	२
द. ना. नक्षाणे	३
ना. रा. पुप्पलवार	१
ना. शि. निवुढे	२
पु. म. चमडीया	२
मु. आ. बाजोरीया	२
श. नी जोशी	३
कु. वेणूताई रामटेके	३
बु. तु. मुन्घाटे	३
म. अं. सोहोने	३
ना. न. लांडगे	३
सा. श्री. पवित्रकार	३
म. द. मायणे	३
ज. कृ. राऊत	२
गु. बा. चरडे	२
पु. कृ. ठाकूर	३
सु. ग. आरेकर	३
गो. गो. ठाकरे	३
पां. रा. वेंदवार	२
शं. अ. घोरमारे	३
ना. ता. राजूरकर	२
अ. दे. सिरपूरकर	२
भा. शि. भोयर	२
आ. ल. शिंगनजुडे	३
रा. भि. कहाळकर	३
तु. पां सोनेवाने	३
कु. आशालता थोते	१
,, आशा इंगळे	३
,, नलिनी पुणतांबेकर	२
,, पुष्पा भोगे	१
,, माया हस्तक	३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मे १९५५

नांव	श्रेणी	सु. वु. नंदेश्वर	३	र. शा. मानोरकर	२
,, यासमीन सोरावजी	३	न. म. गोगल	३	शं. गो. देशमुख	२
,, विमल तिवारी	३	प. र. आटे	३	वि. श्या. देवळे	२
,, शकुन्तला राठी	२	ह. वि. सुरनकार	३	उ. कि. सांगळे	३
,, शालिनी देशमुख	३	गो. वि. आलकरी	३	रं. गो. कोठारी	३
,, सुधा जगताप	३	दि. गो. पाठक	३	भा. र. काजळे	३
,, सुशिला भुतडा	२	दि. तु. झाडे	३	व. वि. काजळे	३
ज. दे. महाजन	२	पां. कृ. वोरांडे	३	म. ज्ञा. वराडे	२
रा. शे. भोगे	३	ब. सो. खंडारे	३	वि. ज. गुजर	२
यु. वि. राठी	३	म. ज. मोरे	३	म. रा. राठी	३
र. सुं. सराफ	३	र. मा. सारडा	२	नि. त्र्यं. कोल्हे	२
मो. ना. राठी	३	रा. ज. रुमाले	३	व. तु. विचनकर	३
दि बा. खानापूरकर	३	रा. बा. जाधव	३	लि. शं. नाफडे	३
दि. गो. लोडाया	३	प. कि. नेमाडे	३	ग. रा. गुजर	२
कु. अहिल्या लाऊत्रे	३	पां. वा. वांवल	३	सु. द. देशमुख	२
,, इंदू ढोले	२	तु. मा. पोटे	३	म. कृ. दारव्हेकर	३
,, पार्वती इंदूरकर	३	ना. स. म्हसकी	२	वि. रा. हिरळकर	२
,, प्रमिला कोरे	३	म. उ. ठाकरे	३	कि. ह. पाटील	३
,, लीला इंगळे	२	सौ. शांताबाई देशमुख	२	बा. सो. वासाडे	३
सौ. सोनू ढवळे	३	,, मालतीबाई कुळकर्णी	३	चं. रा. मामीडवार	२
कु. सिंधू विचोरे	३	शेषराव शंकर तायडे	३	शं. बा. मुक्कावार	३
,, शशिकला अयाचित	१	मंदाकिनी कांत	१	शं. रा. काळे	३
,, हिरकणी शिंदे	२	हि. ग. सावरकर	२	प. भा. पाथ्रीकर	३
श्यं. व. गादे	३	ना. स. इंगोले	२	ह. मि. पाटकर	३
घ. का. सरोदे	२	ज. म. इंगोले	३	कु. कुसुम खारोडे	२
ना. क. सवाई	२	उ. शि. राऊत	३	कु. हेमलता लांवे	२
ना. ना. कडू	३	ग. मा. गायकवाड	३	कु. विजया पेशकार	२
प्र. मा. चित्रकार	२	ह. वं. कावरा	२	वा. ह. काटोळे	३
पं. सु. उपाध्ये	१	सो. रा. कावरा	२	ना. चिं. निलाटकर	१
भ. तु. कथे	३	श्री. गो. जोशी	३	सु. दा. पेशकर	१
भी. म. काळवांडे	३	पुं. श. सौभागे	२	नी. रा. सायरे	१
मा. गं. दहीकर	३	गो. श्री. मिश्रा	२	दा. भी. देशमुख	३
मा. तु. पंचपात्रे	३	द. आ. घुगे	३	श. स. भोपे	२
म वि. वोंडे	३	सो. ज. देवळे	३	बा. पं तायडे	२
य. हि. मुखे	३	सं. ख. घुगे	२	रा. श्या. कोरडे	१
रा. ज. रोडे	३	त्र्यं. प्र. इंगळे	३	ह. हि. जाजू	२
व. कृ. गुल्हाने	३	रा. पु. गोटे	३	कु. राधा राठी	१
सौ. शकुंतलाबाई मोहोड	३	उ. तु. वरडे	३	,, सुमन देशमुख	२
कु. सलिता सबजीवाले	२	द. ना. बांडे	३	,, सुंदर जाजू	२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

नांव	श्रेणी
वि. ना. वारई	३
शा. श. भुतडा	१
ह. ना. जुमळे	२
ह. ग. पागरुत	२
म. ब. फोकमारे	३
सु. मो. निंबाळकर	३
त्र्यं. तु. घुमाळे	३
उ. पं. पाटील	३
शं. भ. निकम	३
पुं. ना. साळोक	१
पु. प्र. जोशी	३
कु. निशा पांडे	२
,, वत्सला पराते	२
सौ. विजया द्रव्यकार	३
कु. सिंधू सरोदे	३
श. रा. कठाळे	३
शा. द. वाघमारे	२
गो. दौ. काळे	३
प्र. दौ. कांवळें	२
पं. ल. मिटकर	३
भा. श्री. खेळकर	३
मु. या. कामतवार	३
रा. य. राऊत	१
वा. सो. चापले	३
वा. ल. गायकवाड	३
गो. ना. अत्रे	२
पी. सुंदरम् अय्यर	३
कु. अचला रत्नपारखी	२
,, कालिंदी गावंडे	२
मा. स. क्षीरसागर	२
त्र्यं ना. चोपडे	३
वि. अ. थोरात	३
म. रा. भुजवले	३
म. पुं. वगाडे	३
रा. अं. गुचिया	३
मु. ग. खंडेराव	२
रा. वा. सुरकार	३
प्र. द. सावरकर	२
प्र. द. पानसे	३
ज. रा. राऊत	३
ना. प. देवहाते	३
रा. शं. देशमुख	२
कु. हिरू बोंडे	२
,, पंचफुला सावरकर	१
,, इंदू देशमुख	१
,, रजनी जोशी	१
,, नवुताई राऊत	३
ना. म. राऊत	३
वि. रा. देशमुख	३
स. बं. भालचक्र	२
भी. कि. भागवत	२
वि. श्रा. गवई	२
रा. शि. नाईक	२
शे. म. वासनकर	१
द. ब. सावरकर	३
पु. गु. भुयार	३
मा. म. भुसारी	३
कृ. ना. कोडापे	२
म. के. चौधरी	२
म. आ. देशमुख	१
कृ. रं. सावरकर	३
रा. शा. कोहळे	२
गो. सी. गावंडे	२
श. ना. चमणकर	३
ज. र. पुनाळेकर	२
प्रे. फ. रोडके	३
प्र. के जाभोरकर	२
श. श. आयदे	३
वि. ग. नंदनवार	३
भा. वि. चोपडे	२
के. तु. वांगडकर	२
रा. चि. माईक	२
रा. क. निकोसे	२
गो. रू. येरणे	३
म. तु. शेंडे	३
उ. नि. पटले	२
रा. रा. फुंडे	३
स. सं. डफळें	३
मो. दा. शहारे	३
कु. सुशिला खेतान	३
,, कु. सप्तर्षी	३
,, पुष्पलता रोंटीवार	३
ज. ना. लांजेवार	२
प्र. बा. वानखेडे	२
ना. म. तलमले	२
शं. गं. चोपडे	२
सो. भा. श्रावणकर	२
रा. सी. खंडाईत	१
रा. पा. चरपे	१
तु. सु. मेश्राम	३
दे. मो. निखाडे	२

प्रवेश

गुणानुक्रमें

१ बालमुकुंद मोहोबे, नागपूर १

प्रावीण्य

२ नत्थू कुंभलवार, नागपूर १

३ प्रभाकर सावरकर, साऊर १

४ मधुकर टिकेकर, नागपूर १

५ वसंत मात्रे, दारव्हा

नांव	श्रेणी
ल. ज. आगलावे	२
शि. चं. कासार	३
ब. ज. बोंडे	२
सु. ग. तिवारी	३
शा. कि. कुमरे	२
रा. ल. राजन	३
ऋ. चं. रावत	२
अ. द. जैन	२
बा. रा. मोहबे	१
खे. ला. नाकतोडे	२
न. स. कुंभलकार	१
कृ. म. नेमा	३
कु. नत्री कारेकर	३

(उरलेलीं नांवें पान ३६ वर पहा)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

श्रीमंत बुटी बंधूंची वि. सा मंदिराला भेट

शनिवार दि. २६-३-५९ रोजीं नागपुरांतील सुप्रसिद्ध श्रीमंत बुटी घराण्यांतील मंडळींनी विदर्भ साहित्य मंदिराला भेट दिली. बुटी घराण्यांतील श्रीमंत गणपतराव बुटी, श्रीमंत आप्पासाहेब बुटी, श्रीमंत बाळासाहेब बुटी, श्रीमती मालतीबाई बुटी आणि कुमारी ज्योत्स्ना बुटी यांनी विदर्भ साहित्य मंदिराचीं सर्व दालनें पाहून समाधान व्यक्त केलें.

या प्रसंगीं उपस्थितांचा त्यांचेशीं परिचय करून देण्यांत आला.

कार्यकारी मंडळाची सभा

दि. १७-४-५९ रविवारीं सकाळीं ९ वाजता संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा केन्द्रीय कार्यालयात भरली.

प्रथम सरचिटणीसांनी दि. १३-३-५९ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला. तो मंजूर झाला.

नंतर उपाध्यक्ष, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी दिलेला उपाध्यक्षपदाचा राजीनामा सभेपुढे विचारार्थ आला. ह्या प्रसंगीं श्री दि. ब. पंडित यांनी पुढील ठराव मांडला:—

"कार्यकारिणीची ही सभा श्री. बाळासाहेब ढवळे ह्यांनी दिलेल्या राजीनाम्याचा स्वीकार करते. ह्या पत्रांत लिहिलेल्या स्थित्यनुरूप श्री. बाळासाहेबांस हा राजीनामा देणें अवश्य वाटतें. सबब तो सखेद स्वीकारला जात आहे. त्यांनी गतवर्षीं व ह्या वर्षीं आतापर्यंत वि. सा. संघाचे उपाध्यक्ष ह्या नात्याने जें काम केलें व कळकळ दाखविली त्याची संघास जाणीव आहे व त्याबद्दल त्यांस धन्यवाद.

उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असला तरी सभासद या नात्याने त्यांचें सहकार्य सदैव कार्यकारिणीला लाभेल अशी आशा आहे.

त्यागपत्र आज ता. १७ एप्रिल १९५९ रोजीं दुपारीं १२ पासून अंमलांत येईल."

ठराव मंजूर होऊन, सभेने श्री. बाळासाहेब ढवळे यांचा उपाध्यक्षपदाचा राजीनामा स्वीकृत केला.

तदनंतर उपाध्यक्षांच्या रिकाम्या झालेल्या पदासाठी श्री. ना. रा. शेंडे यांचें नांव सुचविण्यांत आलें. दुसरें कोणतेंच नांव उपाध्यक्षासाठी पुढे न आल्याने श्री. ना. रा. शेंडे यांची उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाल्याचें अध्यक्षांनी जाहीर केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर १९५५-५६ सालासाठी अंदाजपत्रक सरचिटणिसांनी सभेपुढे पुनर्विचारार्थ सादर केलें. अंदाजपत्रकावर जमाखर्चाची कलमवार चर्चा होऊन, किरकोळ दुरुस्त्यांसह तें मंजूर झालें, व तें वार्षिक साधारण सभेस सादर करण्यांत यावें असें ठरलें.

यानंतर श्री. नानासाहेब जोग यांच्या मागील कार्यकारी मंडळापुढे विचारार्थ ठेवण्यांत आलेल्या पत्रासंबंधी, 'मराठी जग', यांचेकडून आलेल्या उत्तराच्या दोन्ही पत्रांवर विचार करण्यांत आला. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन, श्री. वसंत बाळाजी शब्दे यांनी लिहून पाठविलेल्या सूचनापत्रानुसार या संबंधांत तडजोड घडवून आणण्यासाठी श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. नानासाहेब जोग व श्री. त्रिं. गो. देशमुख यांची उपसमिति बहुमताने नेमण्यांत आली, व त्यानंतर ही सभा आटोपली.

* *

वार्षिक सर्वसाधारण सभा

दि. २४-४-५५ रविवारीं सायंकाळीं ५ वाजतां स्थगित झालेली वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशीं त्याच जागीं सायं. ५-३० वाजतां संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली.

सर्वप्रथम सरचिटणिसांनी दि. २०-२-५५ रोजीं भरलेल्या संमेलनप्रसंगींच्या साधारण सभेचा अहवाल सभेला सादर केला व तो मंजूर झाला.

त्यानंतर, उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी १९५४-५५ चें वार्षिक प्रतिवृत्त सभेला सादर केलें व तें प्रचंड बहुमताने मंजूर झालें.

नंतर सरचिटणीसांनी १९५५-५६ सालचें अंदाजपत्रक कलमवार सभेला सादर केलें व तें प्रचंड बहुमताने मंजूर झालें.

त्यानंतर १९५४-५५ सालचे अधिकृत हिशेब तपासनिसांनी तपासून दिलेले वार्षिक हिशेब सभेला सादर करण्यांत आले व ते प्रचंड बहुमताने मंजूर झाले.

त्यानंतर १९५५-५६ सालासाठी हिशेब-तपासनिसांच्या निवडणुकीचा प्रश्न सभेपुढे आला. श्री. पु. य. देशपांडे यांनी श्री. महेश्वर गद्रे यांचें नांव सुचविलें. श्री. गं. सा. सहस्त्रबुद्धे यांनी त्याला दुजोरा दिला. दुसरें नांव पुढे न आल्याने श्री. महेश्वर गद्रे यांची १९५५-५६ सालासाठी अधिकृत हिशेब-तपासनीस म्हणून एकमताने निवड करण्यांत आली असें अध्यक्षांनी जाहीर केलें.

ह्यानंतर श्री. द. शं. फडके यांच्या सूचनेवरून १९५४-५५ सालांत परीक्षा-समितीच्या ५०० रु. च्या जादा खर्चास एकमताने मंजुरी देण्यांत आली.

उपस्थितांचे अध्यक्षांनी आभार मानल्यावर ही सभा संपली.

* *

हिंगणघाट शाखा

दि. ८-४-५५ रोजीं नटसम्राट बालगंधर्वांचा सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं शाखाध्यक्ष श्री. वि. वि. सोमण यांनी बाळगंधर्वांचा सुटसुटीत परिचय करून दिला. शाखेतर्फे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बालगंधर्वांना मानपत्र आणि चांदीची दत्तमूर्ति भेट म्हणून अर्पण करण्यांत आली. बालगंधर्वांनी गोड भाषेंत उत्तरादाखल छोटेसें भाषण केलें.

*　*

खामगांव शाखा

खामगांव शाखेच्या सभासदांची सर्वसाधारण सभा दि. ८-४-५५ रोजीं भरली.

सभेंत ३१ मार्च १९५५ अखेरपर्यंत शाखेचें इतिवृत्त आणि गेल्या वर्षीचे हिशेब मंजूर करण्यांत आले.

नवीन वर्षासाठी पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

अध्यक्ष— डॉ. पु. गो. एकबोटे उपाध्यक्ष—श्री. द. रा. गोमकाळे व प्राचार्य के. मा. मुन्शी कार्यवाह—प्रा. ऊर्ध्वरेषे व प्रा. नाईक कोषाध्यक्ष—श्री. ओझरकर सभासद—डॉ. पु. म. पारसनीस, श्री. महाशूर, प्रा. तारे, प्रा. डावरे, प्रा. सहस्रबुद्धे, प्रा. डांगे, दे. वि.अडावदकर, श्रीमती रत्नप्रभाबाई घारपुरे, सौ. नलिनीबाई ठोसर, आणि कु. शरयू चक्रदेव.

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना बसणाऱ्या खामगावांतील विद्यार्थ्यांना पुस्तकें पुरविण्याची सूचना सभेंत मंजूर झाल्यावर सभा संपली.

*　*

विदर्भ साहित्य संघ-शाखा भंडारा, वार्षिकोत्सव १९५५

भंडारा शाखेचा वार्षिकोत्सव येथील सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्यानें दि. ९ व १० एप्रिल रोजीं अत्यंत यशस्वीपणें व थाटांत कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षते-खाली साजरा करण्यांत आला.

९ एप्रिल रोजीं सकाळीं ९ वाजतां आदर्श चित्रमंदिरांत माजी केंद्रीय मंत्री श्री. काका-साहेब गाडगीळ यांचे हस्तें उद्‌घाटन करण्यांत आलें. आदर्श चित्रमंदिर श्रोत्यांनी फुलून गेलें होतें. गावांतील प्रतिष्ठित बहुसंख्येने आले होते. या उत्सवाकरितां संघाध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे, मुद्दाम हजर होते. स्वागत व परिचय आटोपल्यावर चिटणीस श्री. बसंतराव शब्दे यांनी अहवाल वाचन केलें. यानंतर श्री. काकासाहेब गाडगीळ यांचें अत्यंत विद्वत्ताप्रचुर व वक्तृत्वपूर्ण असें उद्‌घाटनपर भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत "मराठी भाषा व तिची संस्कृति यांचें श्रेष्ठत्व, भाषेचें अधिष्ठान, भाषावृद्धीकरता आवश्यक असलेल्या गोष्टी या विषयांवर बोधपूर्ण चर्चा केली."

यानंतर श्री. अण्णासाहेब खापर्डे यांचें अध्यक्षीय भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत आधुनिक साहित्यांतील अनिष्ट प्रवाह व इतर प्रचलित साहित्यिक विषयांवर चर्चा केली. शेवटी आभारप्रदर्शनानंतर "मराठी असे आमुची मायबोली" हें गीत झाल्यानंतर कार्यक्रम संपला.

त्याच दिवशीं रात्रौ ८ वाजतां संघाध्यक्ष बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली "ललित वाङ्मयामुळे बौद्धिक खाद्य मिळण्यापेक्षा मनोविकृति निर्माण होते." या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादांत श्री. ना. रा. शेंडे, श्री. दि. ब. पंडित, श्री. म. अ. चान्सरकर यांनी भाग घेतला.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रात्री ९॥ वाजतां संगीत सभेचा कार्यक्रम झाला. श्री कुमार वाडेगांवकर यांचें तबला-वादन व कु. कुसुम काटे यांचें गोड गायन यामुळे संगीत सभा सर्वांना फार आवडली. दि. १० एप्रिल रोजी सकाळीं ८ वाजतां आदर्श चित्रमंदिरांत संघाध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे यांचें " जीवन व साहित्य " या विषयावर भाषण झालें. यानंतर अण्णासाहेब खापर्डे यांचें समारोपाचें भाषण झाल्यावर आभारप्रदर्शन व वंदेमातरम् होऊन वार्षिकोत्सवाचा कार्यक्रम पार पडला

या वार्षिकोत्सवाला आलेल्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था श्रीमंत भास्करराव बुटी यांचेकडे उत्तम तऱ्हेने करण्यांत आली होती. या यशस्वी वार्षिकोत्सवाचें सर्व श्रेय मुख्यत. वि. सा. संघाचे उत्साही चिटणीस श्री. वसंतराव शब्दे यांचेकडे जातें. अत्यंत अल्पावधींत विशेषत: स्थानिक सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्यानें अशा प्रकारें यशस्वी कार्यक्रम घडविण्याचा त्यांचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री दलाल, चिटणीस श्री. साठे, श्री. गोसावी, श्री. निनावे, श्री. हर्डीकर व श्रीमंत भास्करराव बुटी व इतर सर्व कार्यकर्ते या यशस्वी वार्षिकोत्सवाबद्दल अभिनंदनास पात्र आहेत.

परीक्षाफल (पान ३२ वरून)

नांव	श्रेणी				
,, लीला कुबीटकर	३	श. म. साहू	१	अ. रा. इंगळे	२
भा. पां. माहाकारकर	२	मो न. साहू	३	मु. ना. बारई	२
भा. पां. माहाकारकर	२	अ. के. देशपांडे	१	दे. म. नरड	२
मु. गो. पिंपळकर	२	कु. कुसुम गुल्हाणे	२	मा. ह. देवतळे	१
सो. द. राहाटे	२	चि. घों. जयपूरकर	१	कु. शकुंतला तुली	३
कु. वत्सला उपरीकर	३	दा. रा. निमकर	३	म. य. टिकेकर	१
ज्ञा. स. उपरीकर	३	दे. अ. बाळस	३	अ. भि. अग्रवाल	३
अ. ज़ब्बार अ. कादर	२	कु. नानी गुल्हाणे	३	पे. जु. भारती	३
मु. फ. मस्के	३	म. जै. निमकर	३	रा. शि. पनपालिया	३
छो. क्ष. गुप्त	३	कु. लीला कुल्लरवार	२	श्री. भ. गोयनका	३
शं. बा. श्रीवास्तव	३	,, लीला कन्हळकर	३	उमरखाँ पठाण	३
ह. हि. साहू	३	व. बा. मात्रे	१	प्र. मा. सावरकर	१
खि. ह. देवांगन	३	वा. क्षो. ताजने	३	दे. म. बोंडे	१
मू. अ. चन्दाकर	३	कु. विद्यादेवी रायकुंवर	३	वि. गो. डाखोडे	२
मं. रा. त्रिपाठी	३	शा. कि. निमकर	२	दे. म. घामणकर	३
गो. कुं. वर्मा	३	सु. दे. देशपांडे	२	कु. विमल मोदी	२
खो. नि. वर्मा	३	सू. ना. वदूकले	२	,, विमला गुप्ता	३
		भ. य. चित्रे	२	,, ए. सुलोचना गंगाराव	३
		भ. भा. लपालकर	३	उ. शि. बाजपेयी	३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाटयगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ